म. ग्रं. सं. ठाणें

| | | |
|---|---|---|
| विषय | लेखक बाबा पदमजी | सन १८५५ |
| संग्रहालय क्रमांक ५२ | पुस्तकाचें नांव महाराष्ट्र देशाचा साद्यन्त इतिहास | |
| ७६ | | |


82 -

इति

# SHORT HISTORY OF MAHARASHTRA

FOR

THE USE OF SCHOOLS

BY

BABA PADMANJI.

शाळांकरितां

# महाराष्ट्र देशाचा संक्षिप्त इतिहास.

BOMBAY:

PRINTED FOR THE

Christian Vernacular Education Society,

AT THE "ORIENTAL PRESS."

मुंबईमध्यें

ओरिएन्टल " छापखान्यांत छापिला.

सन १८६६.

# सूचना.

महाराष्ट्र देशाच्या इतिहासावर इंग्लिश व मराठी भाषेंत जे ग्रंथ आहेत त्यांच्या सहायाने हा संक्षिप्त इतिहास मुलांसाठीं तयार केला आहे. आजपर्यंत मराठी भाषेंत ह्या विषयावर जीं पुस्तकें झालीं आहेत त्यांत नाहींत अशा बहुत गोष्टी ह्या पुस्तकांत घेतल्या आहेत.

बाबा पद्मनजी.

# अनुक्रमणिका.

## प्रकरण १.

### प्राचीन वृत्तांत.

इतिहास शिकण्याचीं कारणें व त्यापासून लाभ—देशमर्यादा—मूळ प्रजा—आर्यलोक—बौद्धलोक—ग्रीक व मिस्त्रीलोकांचा महाराष्ट्र देशाशीं संबंध—शालिवाहनाचा शक. . . पृष्ठ १

---

## प्रकरण २.

### दक्षिणेंत मुसलमानांच्या स्वाऱ्या व बाहमनी राज्याची स्थापना.

इ० सन १२९५—१४६०.

दक्षिणेंत मुसलमानांचा प्रवेश—त्यांचा उत्कर्ष—बाहमनी राज्याची स्थापना—अल्लाउदीन—सुलतान महमद—सुलतान मुजाहिद—प्रजेचें कल्याण करणारा सुलतान महमूद—फिरोजशाहा—विजया नगरचे राजाची सभा—अल्लाउदीन २ रा. . . . . . . . . . . . . . . . . . . . .पृष्ठ ८

---

## प्रकरण ३.

### बाहमनी राज्याची समाप्ति व त्यापासून उत्पन्न झालेलीं राज्यें.

इ० सन १४६०—१६८६.

बाहमनी वंशांतील अणखी कित्येक सुलतानांच्या गोष्टी—माळव्याचा सुलतान—महमूदशाहा याचें दांभिकाचरण—

सुलतान महमदशाहा बेळगांवचा किल्ला घेतो–ब्राह्मनी राज्याची समाप्ति– नवीन तीन राज्यें – त्यांत मोगलांचा हात–मलिकंबर – अवरंगझीब विजापूर वगैरे राज्यांचा नाश करितो–पोर्तुगीज व इंग्लिश यांचें महाराष्ट्र देशीं आगमन. . . . . . . . . . . . . . . पृष्ठ १७

## प्रकरण ४.

### मराठ्यांचा इतिहास.

### शिवाजी.

१६२७—१६८०.

मराठेलोक कसे वाढले– त्यांचीं प्रख्यात कुळें– शिवाजीचे पूर्वज–शाहाजी–शिवाजीचा जन्म–त्याचें बाळपण–तरुणपणांतील कामें–पुंडाई– त्यास जिंकण्याचा विजापूरकरांचा यत्न– अफसूलखान– मोगलांचा यत्न– शाईस्तेखान–शिवाजी सुरत लुटतो–जयशिंग– शिवाजी दिल्लीस जातो–बंदींत पडतो–कसा सुटतो–शिवाजी सिंहासनावर बसतो– त्याचे अष्टप्रधान–त्याचीं अणखी कित्येक लुटालुटीचीं कामें – कर्नाटकांत' शेवटची मोहिम–त्याचा मृत्यु– त्याचें गुणवर्णन – त्याचें राज्यचातुर्य–चौथ व सरदेशमुखी– ग्रंथकार. . . . . . . . . . . . . पृष्ठ २४

## प्रकरण ५.

### संभाजी–राजाराम–ताराबाई.

१६८०–१७०८.

संभाजी–त्याची क्रूर वर्त्तणूक– त्याचीं युद्धें– कलूशा– संभाजी

मोगलांच्या हातीं लागतो–त्याचे हाल व मरण– मराठ्यांचें शौर्य– त्यांची सभा– राजाराम – मराठ्यांचीं स्वतंत्र सैन्यें–अवरंगझीब दक्षिणेंत येतो– राजारामाचा मृत्यु – मराठे देश लुटीत सुटतात – अवरंगझिबाच्या सैन्याचा नबळेपणा व बेमानीपणा. . . . . . . . . . . .पृष्ठ २६

---

## प्रकरण ६.

### शाहू, रामराजा, शाहूमहाराज, प्रतापसिंह, आणि शाहाजी.

१७८०—१८४०.

शाहू– त्यावर अवरंगझिबाची प्रीति– त्याची सुटका– त्याचें दक्षिणेंत येणें–ताराबाई– कोल्हापूरचें संस्थान–अक्कलकोटकर भोसल्याची उत्पत्ति – बाळाजी विश्वनाथ– शाहूचें व मराठी राजांचें तेज कसें नष्ट झालें–मराठ्यांचा पराक्रम– ब्राह्मणांची स्वार्थसाधक युक्ति – राजाराम– शाहू महाराज–प्रतापसिंह– शाहाजी– व्यंकोजी. . .पृष्ठ ४२

---

## प्रकरण ७.

### पेशव्यांचा इतिहास.

### बाळाजी विश्वनाथ–१ ला बाजीराव.

१७१४—१७४०.

बाळाजी विश्वनाथ दिल्लीच्या कारभारांत शिरतो– कानोजी आंग्र्या – निजामउल्मुलुक – महाराष्ट्र कवी – श्रीधर–मोरोपंत– १ला बाजीराव– त्याची राजनीति – खंडेराव

दाभाडे— दमाजी गायकवाड— त्रिंबकजी दाभाडे— तळे-
गांवची दक्षिणा पुण्यांत चालू होती— दक्षिणाप्रैज-
कमिटी—मराठी लष्कर दिल्लीस जातें— मराठ्यांस काय
लाभ होतात— मराठी कुळें — होळकर— शिंदे— गाय-
कवाड— धारकर पवार— नागपुरचे भोसले— इंग्लिश,
फ्रेंच, व पोर्तुगीस— चिमणाजी आपा—मराठी कवी. . . पृष्ठ ४७

## प्रकरण ८.

### बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब.

१७४०—१७६१.

बाळाजी बाजीरावानें ब्राह्मणांची सत्ता कशी वाढविली—
रघुजी भोसला—पुणें पेशव्यांची गादी होती— बाळाजीचा
स्वभाव— त्याचे मदतनीस—रयतेची स्थिति— पेशव्याच्या
हिंदुस्थानांत स्वाऱ्या— पहिली स्वारी— दुसरी स्वारी—
पानपतची लढाई— अफगाण लोकांचा क्रूरपणा—नाना-
साहेबाचा मृत्यु— इंग्लिशाची पेशव्यांस कुमक—देशाच्या
बंदोबस्ताचे कायदे . . . . . . . . . . . . . . . . पृष्ठ ५३

## प्रकरण ९.

### माधवराव — नारायणराव — रघुनाथराव.

१७६१—१७७४.

माधवराव आपला विरोधी रघुनाथराव याशीं स्तुत्य वर्तणूक
करितो— हैदराचा उदय— मराठी सैन्य पुनः दिल्लीस
जातें— रयतेची स्थिति— राम शास्त्री— नाना फडन-
विसाचा उदय— मराठी ग्रंथकार— नारायणराव पेशवा—

त्याचा वध– रघुनाथराव पेशवा–पुण्याच्या दरबारांतील तूळकट फळी– सवाई माधवराव– रघुनाथराव इंग्लिशांची कुमक घेतो– तो नेमणूक घेऊन स्वस्थ बसतो – इंग्लिशांस काय लाभ होतात– नानाचा व महादजी शिंद्याचा उत्कर्ष– माधवराव आत्महत्या करून मरतो– खरड्याची लढाई– देशाची स्थिति . . . . . . . पृष्ठ ६०

## प्रकरण १०.

## बाजीराव रघुनाथ.

### १७९६ – १८१८.

बाजीराव रघुनाथ पेशवा होतो–नाना कैदेंत पडतो–पुण्यांत लूट होते– बाजीरावाचें शिंद्यासीं कपट–नानाचें मरण व गुणवर्णन– घासीराम कोतवाल–शिंदा व बाजीराव पुणें लुटतात– होळकराच्या घराण्यांत भांडण– यशवंतराव होळकराचें पेशव्यासीं युद्ध– पेशवा कोकणांत पळतो– तो इंग्लिशांची मदत मागतो– वसईचा तह–घोडनदीवर गांव वसतो–इंग्लिशांच्या शिंदे व होळकर यांसीं लढाया–देशांत कांहीं काळ स्वास्थ्य– बाजीराव वसईचा तह मोडतो–गंगाधर शास्त्री–त्रिंबकजी डेंगळ्या–पेंढारीयांचा मोड–खडकीजवळ पेशवा इंग्लिशांसीं लढतो–बाजीरावाचा क्रूर स्वभाव–बाजीराव पळत सुटतो–इंग्लिशांस शरण येतो–पेशव्याच्या राज्याची समाप्ति–बाजीराव पळतांना ज्या लढाया झाल्या त्या–कोरेगांवची लढाई–क्यापटन स्तानटन–लेफनेंट पाटीनसन–आपुगांवला–बाजीराव बदलण्याचें कारण–अनराबल एलफिन्स्तन साहेब जिंकलेल्या मुलकाची व्यवस्था करितात. . पृष्ठ ६८

६

## उपसंहार.

महाराष्ट्र देशावर पूर्वीपासून कोणी अधिकार केला- त्यांनी प्रजेला कसें वागविलें-त्यांची राज्य करण्याची रीति-एक राजा कां नव्हता-असेंच कोठवर चाललें असतें-देवानें या देशावर दया केली-इंग्लिश राज्यापासून लाभ-हें सरकार इतकें चांगलें कशानें झालें- ख्रिस्ती धर्म-हिंदु व मुसलमानी धर्म नष्ट होत आहेत-लोकांनी कोणता धर्म घ्यावा- प्रार्थना. . . . . . . . . . . . . .पृष्ठ ८०

१ १३५ ५

# महाराष्ट्र देशाचा संक्षिप्त इतिहास.

## प्रकरण १.

५ १३५

### प्राचीन वृत्तांत.

इतिहास शिकण्याचीं कारणें व त्यापासून लाभ—देशमर्यादा — मूळ लोका—आर्यलोक—बौद्धलोक—ग्रीक व मिसरी लोकांचा महाराष्ट्र देशाशीं संबंध—शालिवाहनाचा शक.

१. ज्या घरांत आपण राहतों तें कोणत्या गांवांत कोणत्या दिशेस व कोणत्या ठिकाणीं आहे हें ज्याला ठाऊक नाहीं त्याला लोक वेडा ह्मणतात; त्याचप्रमाणें ज्याला आपल्या देशाची माहिती नाहीं तो सुधारलेल्या लोकांच्या उपहासास पात्र होतो. आतां देशाचें ज्ञान अनेक प्रकारचें आहे, त्यांत त्याचें इतिहाससंबंधी ज्ञान विशेष अगत्याचें आहे. आपल्या देशांत पूर्वीं कोण लोक होते, त्यांनीं कशीं राज्यें केलीं, इत्यादि गोष्टी समजल्याने केवळ कोरडें ज्ञान प्राप्त होतें असें नाहीं, तर त्यांनी श्रमाने, कष्टाने, बहुत काळाने व बहुत द्रव्याने जो घेतलेला अनुभव तो आपणास अल्पआयासाने मिळतो; त्यांनी ज्या चुका व अ-

विचाराचीं कर्में केलीं तीं पाहून आपण आपल्या वर्त्तणुकींत सावध होतों; व ज्या शाहाणपणाच्या गोष्टींनीं त्यांस लाभ झाले ते लाभ आपणास प्राप्त करून घेणें असले तर त्या गोष्टीप्रमाणें चालायास आपणास धैर्य येतें. याशिवाय इतिहास शिकल्याने ईश्वरी सूत्राचा मार्ग बराच स्पष्ट दिसतो. ईश्वर सर्व वस्तूंचा नियंता आहे व तो मनुष्यांच्या योजना व्यर्थ करून आपले संकल्प सिद्धीस नेतो, तो नीतिमानास चांगलें फळ देतो व अन्याय कर्म करणारास शिक्षा लावितो हें इतिहासावरून समजतें.

२. मध्य हिंदुस्थानांतील नर्मदा व महानदी ह्यांच्या दक्षिणेस व दक्षिण हिंदुस्थानाच्या वायव्येस (उत्तरपश्चिम कोनास) जो देश आहे त्याला महाराष्ट्र देश ह्मणतात. याच्या उत्तरेस सातपुड्याचा पर्वत, पूर्वेस वाईनगंगा व वरधा ह्या नद्या, आग्नेयीस (दक्षिणपूर्व कोनास) माहूरपासून गोव्यापर्यंत वांकडी रेघ, आणि पश्चिमेस आरबस्थानाचा समुद्र आहे.

३. महाराष्ट्र देशांत फार प्राचीन काळीं कोण लोक होते व कोणाचें राज्य होतें याविषयीं कांहीं लेख नाहीं. दंतकथांवरूनही विश्वास ठेवण्याजोगें खरें वर्त्तमान समजत नाहीं. सर्व हिंदुस्थानाच्या प्राचीन इतिहासाविषयीं असाच अंधार आहे. तथापि पश्चिमेकडील ह्मणजे युरोपांतील विद्वान व शोधक लोकांनीं बहुत शोध केले आहेत तेच ह्या देशास लागू होतात. त्या शोधांवरून असें सिद्ध होतें कीं, ब्राह्मण आदिकरून जे

अनेक जातींचे लोक हल्लीं एथें आहेत ते पूर्वी या देशांत नव्हते. हिमालयाच्या पलीकडे तार्तार देशांत राहणारे सिथियन अथवा स्कुथी या नांवाचे लोकांची एक मोठी टोळी प्रथम भरतखंडांत आली. त्यांच्या पूर्वी या भूमीवर मनुष्याचे पाय लागले नसावे असा संभव होतो. ही गोष्ट केव्हां घडली याचा आतां निश्चय करितां येत नाहीं. त्या लोकांचे वंशज सर्व हिंदुस्थानांत अद्याप सांपडतात.* महाराष्ट्र देशांत महार, मांग, रामोशी, भिल्ल, (कदाचित् शूद्र) हे त्यांच्या कुळांतले शेष आहेत.

४. ह्या सिद्धांतास प्रमाण एक तर त्यांच्या भाषा. हिंदुस्थानांतील सर्व भाषांत संस्कृत भाषेचें पुरण भरलें आहे; तरी मूळचा पिठाचा उंडा तो त्या पुरणाहून निराळाच आहे. मूळ प्राकृत भाषांचे शब्द निराळेच आहेत. त्यांची उत्पत्ति संस्कृत भाषेंत सांपडत नाहीं. महाराष्ट्र भाषेंत शेंकडा वीस शब्द अशा प्रकारचे आहेत. त्यांच्या भाषेच्या व्याकरणाचे नियमही संस्कृत व्याकरणाशीं सर्व प्रकारें लागत नाहींत. दुसरें एक प्रमाण असें आहे कीं त्यांचा धर्म सांप्रतच्या हिंदु धर्माहून निराळा आहे. जसा शेणाचा गोळा जमिनीवर पडला ह्मणजे त्याला दगड, गवत, माती वगैरे चिकटतात व त्यांत शिरतात याप्रमाणें आतांचा हिंदु धर्म आहे. ब्राह्मणाच्या धर्मास एथल्या मूळ

* बंगाल्यांत बंगीलोक, कोळवणांत कोळीलोक, गोंडवणांत गोंड; याशिवाय, खोंड, सांथाल, वारली, परिया इत्यादि लोक सिथियन कुळांतले आहेत.

प्रजेच्या धर्माच्या बहुतेक गोष्टी चिकटल्या आहेत व आंत शिरल्या आहेत. वेताळ, ह्मसोबा, महादेव अथवा त्याचे अवतार भैरोबा, जोतिबा वगैरे देव; सटवाई, मरीआई, जाखाई, जोखाई इत्यादि देवतें ब्राह्मण धर्माचीं नव्हतीं. तसेच होळी, नरकचतुर्दशी, बळीप्रतिपदा, नागपंचमी इत्यादि सणहि प्राचीन हिंदूंचे नव्हते. अणखी एक प्रमाण ह्या लोकांच्या रीति भाती, आचार, विधि, यांवरून मिळतें. त्यांचीं लग्नें ब्राह्मणाप्रमाणें होत नाहींत, ते आपल्या मेलेल्यांस पुरतात. ते सर्वांच्या हातचें शिजलेलें अन्न भक्षण करितात व गाईचें मास खातात.

९. सिथियन लोकांच्या मागून आर्य लोक या देशांत आले. हे आर्य लोक फार प्राचीन काळीं हिंदुस्थानाच्या वायव्य दिशेकडून येऊन पंजाबांत राहिले होते. ते पशुचारण जीवी ह्मणजे गुरें ढोरें चारून राहणारे लोक होते. ते संस्कृत भाषा बोलत. त्यांच्या मध्यें तेव्हां मूर्त्तिपूजा नव्हती. ते गायींचा व घोड्याचा आणि बकऱ्याचा यज्ञ करीत. गोमांस खात. त्यांनीं सिंधु नदीच्या कांठीं वेद रचले. प्रथम ते सुखवस्तु होते, पण हळूहळू त्यांनीं भरतखंड जिंकण्याचें आरंभिलें. प्रथम त्यांनीं व्यापारास व धर्म स्थापण्यास कांहीं लोक महाराष्ट्र देशांत पाठविले, तेच आतांच्या ब्राह्मण वगैरे उंच ह्मटलेल्या वर्णांचे पूर्वज होत. त्यांनीं सिथियन लोकांचें राज्य किंवा राज्यें जिंकून महाराष्ट्र देशांत आपली सत्ता स्थापिली; आपले कानु कायदे चालू केले, मूळच्या लोकांच्या रीति भाती सुधारल्या, त्यांच्या

भाषांत आपल्या भाषेचे शब्द मिसळले; व त्यांच्या धर्माचे देव व विधि आपल्या धर्मांत ओढून घेतले, अथवा आपल्या धर्माच्या अधिकाराखालीं त्यांस आणिलें. त्यांच्या देवांची पूजा त्यांच्यानी बंद करवली नाहीं ह्मणून त्यांस आमच्या देवादिकानीं वर दिले आहेत यास्तव ते पूजेस पात्र असें कल्पून त्यांची पुनः स्थापना केली*. हिंदूंच्या रामायणादि पुस्तकांत ह्या गोष्टीस पुष्टिकरण मिळतें. राम जेव्हां एथून लंकेस गेला तेव्हां एथें वानर, जांबुवंत, या नांवानी वोळखलेले रानटी लोक होते, व त्याला दंडकारण्यांतून जावें लागलें, आणि एथें हिंदूंच्या ऋषींचे आश्रम जागोजागीं होते, त्यांस राक्षस या नांवाचे लोक उपद्रव करीत, इत्यादि कथांवरून हें अनुमान निघतें.

६. इतकें जरी पुरतेपणीं समजतें तरी त्या मूळचे लोकांचे अथवा त्यांच्या मागून आलेले आर्य लोक त्यांचे राजे कोण होते व त्यांनी कसें राज्य केलें व किती काळ केलें याचा कांहींच शोध लागत नाहीं, व ह्या घडामोडी होण्यास किती काळ लागला याचाही खचीत निर्णय होत नाहीं; तरी असें अनुमान केलें आहे कीं ख्रिस्ती शकापूर्वी ५०० वर्षें ह्मणजे आतांपासून २३०० वर्षांमागें ही दुसरी उलटापालट झाली असावी. व ब्राह्मण लोकानी महाराष्ट्र हें नांव बदलून

---

* आर्य लोकांविषयीं विशेष वृत्त "वेदधर्मी लोकांचा वृत्तांत" ह्या पुस्तकांत पाहावें.

महाराष्ट्र असें नांव ह्या देशास दिलें असावें.*

७. महाराष्ट्र देशास प्राचीन काळीं तिसरा एक वारीस उत्पन्न झाला होता असें दिसतें. ख्रिस्ती शकाच्या तिसऱ्या शतकांत मागध देशांत अशोक नामक एक महापराक्रमी व नामांकित राजा राज्य करीत होता. तो बौद्ध मतानुसारी होता. त्याला सम्राट म्हणजे सर्व देशावर राज्य करणारा असें म्हटलें आहे. त्याचें राज्य महाराष्ट्र देशावर होतें यांत संशय नाहीं. त्याने बौद्धधर्म शिकविण्यास महा धमरक्कितो यास महाराष्ट्र देशांत पाठविलें. त्या असद्धर्माच्या प्रेषितास ८४,००० शिष्य होते, व त्यांतून त्याने १३,००० स महाराष्ट्र देशांत उपदेशकाची दीक्षा दिली असें महावंसो नामक बौद्ध धर्माच्या ग्रंथांत लिहिलें आहे. जैन किंवा बौद्ध यांच्या धर्माचे लोक सांप्रत या देशांत आहेत इतकेंच नाहीं तर त्याच्या पूर्वीच्या सत्तेच्या व धर्माच्या वैभवाच्या खुणाही अद्याप एथें दृष्टीस पडतात. कारळी वगैरे ठिकाणचीं डोंगरांत खोदलेलीं लेणीं, व मोठाल्या शहरांत वस्ती या नांवाचीं देवळें हीं त्यांच्या गतश्रीची छाया दर्शवितात. पंढरपूर, कोलापूर हीं क्षेत्रें पूर्वीं त्यांचीं होतीं. याशिवाय मराठी भाषेची उत्पत्ति मागधी भाषेपासून आहे, किंवा पूर्वींची मराठी हल्लींच्या मागधी भाषेसारखीच असावी, असें व्याकरणवेत्त्यांचें मत आहे.

---

* या देशाचे पूर्वीं हें नांव असावें असें मानण्यास इतर राष्ट्रांचीं नांवें आधार दाखवितात. गुजराथेला पूर्वीं गुर्जरराष्ट्र असें नांव होतें; तसें महाराष्ट्राला महारराष्ट्र कां नसेल कशावरून ?

८. महाराष्ट्र देशाशीं प्राचीन मिसरी व ग्रीक लोकां-च्या व्यापाराच्या निमित्तानें संबंध होता असें दिसतें. ते लोक ख्रिस्ती शकाच्या अगोदर अडीचशें वर्षें तगारा नामक राजधानीस व्यापारास येत असत. परंतु ह्या शहराचें नांव हिंदु लोकांस जरी ठाऊक आहे तरी तें कोठें होतें व तेथें कोण राजा होता याचा आतां निश्चय होत नाहीं. तें गोदावरीच्या कांठीं असावें व तेथें एक रजपूत राजा राज्य करीत होता असें अनुमान केलें आहे. ख्रिस्ती शकापूर्वी १३० वर्षांचा एथल्या देशाविषयींचा दुसरा एक लेख ग्रीक लोकांच्या ग्रंथांत सांपडतो, तो असा कीं मुंबईजवळ कल्याण ह्मणून जो गांव आहे तेथें त्या वेळीं ग्रीक व्यापारी आले होते.

९. दक्षिणेंत शालिवाहन नामक शूद्र जातीचा राजा शककर्त्ता झाला, परंतु त्याचा वृत्तांत कल्पित काहण्यांनीं भरला आहे. त्याविषयीं इतकेंच समजलें पाहिजे कीं तो नर्मदेच्या दक्षिणेस राज्य करीत होता व त्याच्या स्वाधीन महाराष्ट्र देश होता; व त्याचा व माळव्याचा राजा विक्रमा-जित यांचें युद्ध होऊन शालिवाहनानें विक्रमास जिंकून आपलें राज्य संभाळिलें व विक्रमानें नर्मदेच्या उत्तरेस राज्य करावें असा त्याशीं तह केला. शालिवाहनाच्या शका-चा आरंभ इसवी सनाच्या ७८ व्या वर्षीं झाला, व तो अद्याप महाराष्ट्र देशांत चालत आहे. शालिवाहनाच्या काळापासून तर मुसलमान लोक या देशांत स्वाऱ्या करूं लागले तोंपर्यंत काय वर्त्तमान झालें याचा कांहीं शोध लागत नाहीं.

# प्रकरण २.

## दक्षिणेंत मुसलमानांच्या स्वाऱ्या व बाहमनी राज्याची स्थापना.

## १२९५– १४६०.

दक्षिणेंत मुसलमानांचा प्रवेश– त्यांचा उत्कर्ष– बाहमनी राज्याची स्थापना– अल्लाउद्दीन– सुलतान महंमद– सुलतान मुजाहिद– प्रजेचें कल्याण करणारा सुलतान महमूद– फिरोज शहा– फिरोज शहाचें क्रूरपण– विजयानगरचे राजाची सभा– अल्लाउद्दीन २ रा याची कारकिर्द व त्याचें ढोंग.

१. उत्तर हिंदुस्थानांत मुसलमानांचा प्रवेश झाल्यावर, सुमारें तीनशें वर्षांनीं त्यांनी नर्मदा उतरून दक्षिणेंत* स्वारी केली. सन १२९५ त दिल्लीचा बादशाह जलालुद्दीन याचा पुतण्या अल्लाउद्दीन खिलजी हा आठ हजार स्वारांसहित एकाएकीं देवगडासमोर तळ देता झाला. त्यावेळीं त्यासीं लढायाला महाराष्ट्र देशांत कोणी बळकट राजा होता असें दिसत नाहीं. देवगडचा राजा रामदेव जाधव यानें प्रथम कांहींसा लढाईचा रंग दाखविला, परंतु शेवटीं त्याला शत्रूसीं तह करणें प्राप्त झालें. त्यानें त्याला आपल्या खजिन्यांतील सर्व द्रव्य व आपल्या राज्याचा कांहीं भाग देऊन परत लाविला. हा जय मिळविल्यावर अल्लाउद्दीनास दिल्लीचें तक्तही मिळालें. त्याच्या कारकिर्दींत मुसलमानांनीं तीनदां दक्षिणेंत स्वाऱ्या केल्या;

* महाराष्ट्र देश हा दक्षिणेचा एक भाग आहे, पण एथले लोक बहुधा त्यालाच दक्षिण असें ह्मणतात.

आणि महाराष्ट्र देशाचा बहुतेक भाग हस्तगत केला व नर्मदेपासून कन्याकुमारीपर्यंत सर्व मुलूख लुटून प्रजेस बहुत उपद्रव दिला. परंतु अलाउदिनाच्या ह्मातारपणीं दिल्लीच्या राज्यांत अव्यवस्था झाल्यामुळें दक्षिणेंत हिंदु राजांस सवड सांपडून त्यांनी देवगड खेरीज करून बरकड सर्व प्रांत मुसलमानांपासून हिसकावून परत घेतले.

२. पुढें तोघलख नामें दिल्लीचा बादशाह झाला, त्याच्या वेळीं मुसलमानांची सत्ता दक्षिणेंत पूर्वीपेक्षां अधिक काईम झाली. त्याने देवगडास हिंदु राजांनी घातलेला वेढा उठविला, आणि त्यांतील एका राजास धरून त्याचें जिवंतपणीं कातडें काढलें; असा तो क्रूर बादशाह होता. त्याने दोन वर्षांत तेलंगणाचें बलिष्ठ राज्य जिंकिलें. पण त्या राज्यांतील परागंदा झालेल्या राजपुरुषांनी तुंगभद्रेच्या कांठीं विजयानगर नांवाची एक राजधानी वसविली. तेथील राजे पुढें नर्मदेच्या दक्षिणेकडील सर्व राजांत मोठे पराक्रमी झाले. तोघलखाच्या मागून दिल्लींत महमद तोघलख राजा झाला. त्याने देवगडाचें नांव दौलताबाद ठेविलें, आणि ती जागा आपल्या राज्याची राजधानी करायास दिल्लीच्या लोकांस तेथें जाऊन राहण्याची आज्ञा दिली; तेणेंकरून लोकांस फार त्रास झाला, व त्यांचीं मनें त्यावरून उडालीं. अशा संधींत तेलंगणचा पदभ्रष्ट राजा आपलें राज्य परत मिळविण्याचा प्रयत्न करूं लागला, त्याच्या पारिपत्यास बादशाह मोठी फौज तयार करीत आहे इतक्यांत एक नवीच गोष्ट घडली तेणेंकरून

दक्षिणेंत मुसलमानांच्या दुसऱ्या स्वतंत्र राज्याचा पाया घातला गेला.

३. गुजराथेंत महमद तोघलखाचा जो मुलुख होता त्यावरील कित्येक सरदार बंडावून दक्षिणेंत पळून आले, आणि त्यांनीं तेथील कित्येक हिंदु राजांस अनुकूळ करून घेऊन बादशाही फौजेस जिंकून एक नवेंच स्वतंत्र राज्य स्थापिलें. आणि त्या राज्यावर आपणांतील एक शूर पठाण जातीचा सरदार झुफीरखान नामें यास स्थापिला.

झुफीरखान याचें पहिलें नांव हुसेन होतें. तो दिल्लींत कांगो नामें एका ब्राह्मणाचा गुलाम (दास) होता. त्या ब्राह्मणानें याचे गुण पाहून त्याला कांहीं द्रव्य देऊन मोकळा केला, आणि सांगितलें कीं तूं पुढें भाग्यवान होसील. झुफीरखानास राज्यपद मिळाल्यावर तो आपल्या उपकारकर्त्यास विसरला नाहीं. त्यानें त्याला दिल्लीहून आणून आपला खजीनदार केला. आणि त्याचें नांव, आपल्या वंशास जोडलें. यावरून दक्षिणेंतील पठाण राजांस बाहमनी असें नांव पडलें. झुफीरखान हा सुलतान अल्लाउद्दीन हुसेन कांगो बाहमनी हें नामाभिधान धारण करून राज्यासनावर बसला. इ० स० १३४७ सांत अल्लाउद्दीन राज्य करूं लागल्यावर तो सर्वांशीं मोठ्या सौम्यतेनें व मिलाफीनें वागूं लागला. त्यानें हिंदूंच्या महाजनांस वंशपरंपर चालण्याच्या जमिनी दिल्या; दुसऱ्यांस आपल्या लष्करांत हलक्या जागा दिल्या; अशा रीतीनें त्यानें दक्षिणी लोकांस आपल्या आळ्यांत ठेविलें. तेणेंकरून त्याच्या राज्यास बळकटी आली

त्याने बहुतेक महाराष्ट्र देश जिंकिला होता; केवळ घाट-माथा व कोंकण यांचा कांहीं भाग सुमारें शंभर वर्षेपर्यंत मुसलमानांच्या सत्तेखालीं आला नाहीं. त्याच्या कारकिर्दींत हिंदु लोकांनीं बंडें केलीं नाहींत.

४. बाहमनी वंशाचें राज्य सुमारें १५० वर्षे चाललें. तेवढ्या काळांत एकंदर १६ सुलतानानी राज्य केलें. त्यांचें सविस्तर वर्णन फेरिस्ता नामक एका विद्वान मुसलमान इतिहासवेत्त्यानें केलें आहे, त्यांत बहुत हांसलाच्या गोष्टी आढळतात. त्या मराठींत अद्याप प्रसिद्ध झाल्या नाहींत, या कारणाने व आपल्या देशांत थोड्या काळामागें असअसे राजे होऊन गेले त्यांची कथा माहीत नसणें हें अज्ञान उपहासपात्र आहे असें समजून त्यांतील कित्येक गोष्टींचें सार या प्रकरणांत संगृहीत केलें आहे.

५. बाहमनी वंशाचा दुसरा राजा सुलतान महमदशाहा याने आपल्या दरबाराची शोभा व इतमाम फार वाढविला त्यानें हिंदु राजांशीं इतकें वैर चालविलें कीं, त्यांचीं नाणीं आपल्या हद्दींत आलीं ह्मणजे तीं गाळून टाकावीं. एकदां त्याच्या दरबारांत कोणी गवयानें गाणें गाऊन त्याला खुश केलें, ह्मणून त्यानें त्याला विजयानगरच्या स्वतंत्र राजाच्या जामदारखान्यावर वरात (पैसा देण्याची हुकुमी चिठ्ठी) दिली. ती पाहून विजयानगरच्या राजास राग आला, आणि ज्या जासुदानें ती आणिली होती त्याची गाढवावर बसवून धिंड काढली व दुसरा बहुत प्रकारें त्याचा अपमान करून त्याला परत पाठविलें. त्यावरून सुलतानानें

तीस हजार घोडा, तीन हजार हत्ती आणि एक लक्ष पायदळ इतकी फौज जमवून विजयानगरावर स्वारी केली. या कुरापतीचा परिणाम असा झाला कीं, सुमारें एक लक्ष निरपराधी पुरुष व बायका व मुलें यांच्या रक्ताचे पूर वाहिले. महमदाची ही क्रूर वर्त्तणूक पाहून विजयानगरचा राजा त्याला शरण आला, आणि त्यानें आपली चूक पदरीं घेऊन त्या गवयास सुलतानाच्या वरातीचा भरणा केला. ह्या सुलतानाच्या अमलांत मुसलमान लोक दक्षिणेंत तोफांचा उपयोग करूं लागले. इ० स० १३५७—७४.

६. तिसरा सुलतान मुजाहिदशाहा यानें विजयानगरच्या राजाशीं युद्ध केलें, आणि हिंदूंचीं देवळें व मूर्त्ति फोडल्या.

पांचवा सुलतान महमूद हा कित्येक गोष्टींत फार चांगला राजा होता. त्याला एकच बायको होती. महमदी राजांत हा सद्गुण विरळा. तो कवितेचा मोठा शौकी होता. ही त्याची कीर्ति इराणापर्यंत गेली होती. त्याचा पोशाक फार साध्या व पांढऱ्या वस्त्रांचा असे. त्यानें कलबुर्गे, बेदर, इलीचपूर, दौलताबाद, चेऊल, दाभोळ इत्यादि ठिकाणीं अनाथ मुलांकरितां शाळा घातल्या; व त्यांच्या पोषणाकरितां पुष्कळ द्रव्य दिलें. त्यानें लोकांस कुराणाचा अर्थ सांगण्याकरितां उपदेशक नेमिले; आणि आपल्या राज्यांतील सर्व अंधळ्यांच्या पोटाची सोई केली. त्याच्या कारकिर्दीच्या शेवटल्या सालांत (१३९६ त)

एक भयंकर दुष्काळ पडला,* तेव्हां त्यानें गुजराथ व माळवा एथून धान्य आणून गरीब लोकांस स्वस्तदरानें विकण्याकरितां पदरच्या खर्चाने दाहा हजार बैलांचा तांडा ठेविला होता. ह्या दयाळू व परोपकारी राजाने १९ वर्षें राज्य केलें. तेवढ्या काळांत एक वेळ मात्र मुलकांत दंगा झाला होता. ही गोष्ट त्या वेळच्या स्थितीस लावून पाहिली असतां आश्चर्याची मानिली पाहिजे.

७. फिरोजशहा बाहमनी. हा महमदी धर्माचा मोठा आवेशी होता. त्याने नित्य कुराणाच्या सोळा पानांची प्रत आपल्या हाताने उतरावी. त्याला २०० बायका होत्या. त्यांत आरबस्थान, सर्कासिया, तुर्क, रूस इत्यादि देशांच्या स्त्रिया होत्या, त्यांशीं तो त्यांच्या भाषेंत बोलत असे असें ह्मणतात. त्याने विजयानगरच्या हिंदु राजकन्येशीं आपलें लग्न जबरीनें लाविलें. त्याला विद्वान लोकांच्या मंडळींत बसून वादविवाद व चर्चा करण्याची फार आवड असे. तो कधीं कधीं मध्यरात्रपर्यंत त्यांच्याशीं बोलत बसे. तो वनस्पति, भूमिति, न्यायशास्त्र ह्या विषयांवर व्याख्यानें देई. तौरेत व इंजील ( मोशाचीं पुस्तकें व शुभवर्त्तमानें ) हीं हिब्रि भाषेंत तो वाचीत असे. तो सर्व धर्मांचा मान राखी, पण महमदी धर्म सर्वोत्कृष्ट आहे असें ह्मणे, कारण त्या धर्मांत स्त्रियांस पडद्यांत ठेवण्या-

*ह्या दुष्काळास हिंदु लोक दुर्गादेवी ह्मणत. तो बारा वर्षें होता तेणें-करून देश ओस पडला होता. पाऊस पडूं लागल्यावर तीस वर्षेंपर्यंत सरकारास फार थोडा वसूल येत असे.

ची आज्ञा व मद्य पिण्याची मनाई आहे; तरी तो स्वतां दारूबाज होता. त्याने बालेघाटावर वेधशाळा बांधण्याचें काम चालविलें होतें, पण त्याचा ज्योतिषी मरण पावल्यामुळें तें तसेंच राहिलें. हा सुलतान १४२२ त मरण पावला.

८. फिरोजशहाच्या मागून अहमदशहा वली सुलतान झाला. तो मोठा क्रूर होता. त्याने एका लढाईत तेवीस हजार पुरुष व बायका व मुलें यांची कत्तल केली. त्याने अहमदाबाद बेदर नामें शहर वसविलें. त्याच्या एका सरदारानें मुंबईजवळचा माहीम गांव घेतला.

९. सुलतान अल्लाउद्दीन हा राज्य करीत असतां विजया नगरच्या हिंदु राजाने आपल्या प्रधानांची व सरदारांची मोठी सभा करून, मुसलमानांचा उत्कर्ष आपल्या देशांत कां झाला याचा विचार केला. तेव्हां कित्येक ह्मणाले कीं, हिंदूंवर मुसलमानानी तीस हजार वर्षें राज्य करावें असा ईश्वरी संकल्प आहे. दुसरे जे त्यांहून विचारी व शहाणे होते ते ह्मणाले कीं, मुसलमानांचे घोडे दक्षिणी घोड्यांहून बळकट आहेत, व त्यांच्या लष्करांत पुष्कळ कुशल तिरंदाज नेहमी चाकरीस आहेत, या कारणानी ते इतके श्रेष्ठ झाले आहेत. मग त्या राजानें सर्वांची मसलत घेतल्यावर मुसलमानांस आपल्या लष्करांत चाकरीस ठेविलें, त्यांच्यासाठीं आपल्या राजधानींत एक मशीद बांधली, आणि त्यांच्या धर्माचा कोणी छळ करूं नये असा हुकूम फिरविला. मुसलमान लोकानी आपणास

मुजरा करतांना महमदी धर्माच्या विरूद्ध पाप करूं नये ह्मणून त्याने आपल्या सिंहासनाजवळ एका मोलवान मेजावर कुराणाची प्रत ठेविली.

१०. अल्लाउदिनानें आपल्या राज्यांत गरीब लोकांकरितां अमदाबाद एथें एक अनाथ घर बांधलें, व त्यांतील रोग्यांच्या समाचारासाठीं दोन वैद्य ठेविले. त्याने सर्व आळशी व भटकत फिरणारे भिकारी यांच्या गळ्यांत सांखळ्या घालून त्यांस रस्ते झाडायास व गावांतील घाण व कचरा काढायास लावावें. दारूबाजास दोनतीनदा बुद्धिवाद सांगितल्यावर त्याने आपलें व्यसन न सोडलें तर त्याच्या घशांत शिशाचा रस ओतावा असा त्याचा हुकूम होता; तरी तो स्वतां दारू पीत असे. तो ख्रिस्ती व ब्राह्मण यांशीं कधीं भाषण करीत नसे, व त्यांस आपल्या राज्यांत मुलकी कामें देत नसे. त्याला महमदी धर्माचा मोठा अभिमान होता. त्यानें हिंदूंचीं देवळें मोडून त्यांच्या जागीं मशिदी बांधाव्या. तो स्वतां मशिदींमध्यें उपदेश करीत असे. अशा जागीं एकदां त्यानें उपदेश करितांना आपली स्तुति गाजवून असें ह्मटलें कीं, "मी न्यायी, दयाळू, सहनशील, उदार, देवाचा सेवक सर्व राज्य व धर्मकारभारांत निपुण असा अहमदशहा वली बाहमनी आहे." तेव्हां तेथें एक व्यापारी आरब होता, त्याने महमदास घोडे विकत दिले होते, पण त्यांचा पैका त्याच्या चाकरांकडून त्याला मिळाला नव्हता; व त्याला सुलतानाची निर्दय व जुलमी वर्त्तणूक ठाऊक होती; ह्मणून तो धैर्याने उभा राहून

मोठ्याने ह्मणाला कीं, "तूं न्यायी नाहींस, तूं दयाळू नाहींस, तूं सहनशील नाहींस; तूं निर्दय, व खोटा आहेस; तूं पैगंबराच्या ( महंमदाच्या ) वंशजाची कत्तल केलीस; तरी तूं विश्वासूच्या ( मुसलमानाच्या ) आसनावर उभा राहून आपला बडिवार सांगण्यास भीत नाहींस." हें खरमरीत भाषण ऐकून सुलतानाने त्या व्यापाऱ्याचा पैका तेथल्या तेथेंच देवविला, आणि आपल्या कर्माचा पस्तावा पावून तो आपल्या महालांत गेला, तेथून त्याचें प्रेत कबरेंत जाईपर्यंत तो बाहेर आला नाहीं.—"ढोंग्याचा हर्ष क्षणिक असतो." ईयोब. २०.६.

११. हुमायू हा बाहमनी वंशाचा ११ वा राजा होता. तो फार निर्दय होता ह्मणून त्याचें नांव जालीम पडलें. त्याने तीन वर्षें राज्य केलें, पण तेवढ्या काळांत त्याने सात हजार पुरुष, बायका व मुलें यांचे प्राण घेतले. त्याच्या कित्येक नातलगानी बंड केलें ह्मणून त्याने त्यांचे क्रूर रीतीने हाल करून त्यांस मारिलें. त्याने आपल्या शहरच्या कोतवालास पिंजऱ्यांत घालून रोज त्याच्या आंगाचें मांस थोडें थोडें कापून त्याला खायास घालावें; असें राक्षसी कर्म करून त्याने त्याचा जीव घेतला. असा दुष्ट व घातकी मनुष्यजातीस कलंक लावणारा नररूपी व्याघ्र लवकरच या पृथ्वीवरून नाहींसा झाला ह्मणून बरें झालें.—" दुष्टांचा उत्सव अल्पकालिक असतो." ईयोब. २०.६.

# प्रकरण. ३.

## बाहमनी राज्याची समाप्ति व त्यापासून उत्पन्न झालेलीं राज्यें १४६०–१६८६.

बाहमनी वंशांतील अणखी कित्येक सुलतानांच्या गोष्टी–माळव्याचा सुलतान महमुदशहा याचें ढोंगाचें आचरण–सुलतान महमदशहा बेळगांवचा किल्ला घेतो- खाजाजिहान— बाहमनी राज्याची समाप्ति— नवीन तीन राज्यें—त्यांत मोंगलांचा हात—मलिकंबर—अवरंगझीब विजापूर वगैरे राज्यांचा नाश करितो—पोर्तुगीज व इंग्लिश यांचें महाराष्ट्र देशीं आगमन.

१. बाहमनी राज्याची समाप्ति कशी झाली हें सांगण्यापूर्वीं त्याच्या सुलतानांविषयीं अणखी थोडें वृत्त सांगितलें पाहिजे. सुलतान निजाम शहा हा राज्य करीत असतां माळव्याचा सुलतान महमूद शहा हा त्याशीं युद्ध करायास आला. ह्या महमूद शहाविषयीं असा लेख अढळतो कीं, तो आपल्या खाण्यापिण्याच्या पदार्थांविषयीं फार कांक्षीखोर होता. त्यानें आपल्या भोजनाची रीत कुराणांतील आज्ञेस अनुसरून ठेविली होती. ह्मणजे तांदूळ, तेलें, तूप, शाकभाजी वगैरे पदार्थ ज्याची वंशपरंपर चालत आलेली जमीन असेल, तिजवर उपजविलेले असावे ह्मणून तो ते आपल्या खासगत शेतांत व मळ्यांत पिकवी. तो आपल्या स्वारीबराबर लांकडी पेट्यांत माती भरून त्यांत शाकभाजी पिकवी. जेव्हां तो दक्षिणेंत निजाम शहासीं युद्ध करायास आला तेव्हां त्याला बेदर अमदाबाद एथें भाजीचा तोटा पडला, ह्मणून त्यानें तेथल्या एका मुसलमान

धर्माधिकाऱ्यास बोलावून त्यापासीं तो भाजीचें गाऱ्हाणें सांगूं लागला, आणि ह्मणाला कीं एथें कोणाचा वतनदारीचा मळा असला तर सांगा ह्मणजे त्याला पाहिजे तें मोल देऊन शास्त्राज्ञेप्रमाणें मी भाजी खाईन. त्याला त्या धर्माधिकाऱ्यानें उत्तर दिल्हें कीं "ही तुझी वर्त्तणूक उपहासपात्र आहे. आपल्या धर्माच्या राजावर कारणावांचून शस्त्र धरणें व त्याच्या मुलखांतील निर्दोषी लोकांचीं घरें दारें जाळून त्यांची मालमत्ता हरण करणें, व त्यांचे प्राण घेणें यांचा मनास खेद न होऊं देतां पोशाक व खाणें पिणें यासंबंधी हलके नेम पाळण्याविषयीं जपणें हें मूर्खपण व ढोंग आहे." हें त्या निस्पृही व धारिष्टवान पुरुषाचें भाषण ऐकून सुलतानाच्या डोळ्यांत पाणी आलें, आणि त्याचें बोलणें खरें आहे असें त्यानें कबूल केलें, तरी शेवटीं ह्मणाला कीं, "असीं परस्परांशीं विपरीत व विसंगत कर्मे केल्याशिवाय राज्यें चालायाचीं नाहींत." "जसा कुत्रा आपल्या ओकीकडे फिरतो तसा मूर्ख (बोध केल्यावरही) आपलें मूर्खपण करील." नीति. २६. ११.

२. सुलतान महमद शहा यानें बेळगांवचा किल्ला मोर्चे बांधून व सुरुंग लावून घेतला. किल्ले घेण्याची ही रीत दक्षिणेंत त्याच्या वेळेस प्रथम चालू झाली. त्या राजानें ओरियाचा किल्ला घेऊन तेथें एक हिंदूंचें देवालय होतें त्याच्या ब्राह्मण पुजाऱ्यास आपल्या हातानें वधिलें, व असें करणें धर्मकृत्य आहे असें त्यानें दर्श-

विलें. बाह्मनी वंशाच्या राजानें ब्राह्मणास मारल्याचा हा पहिलाच लेख अढळतो. त्यानें दुसरींहि हिंदूंचीं देवळें बाटवून बहुत नाश केला.

२. ह्या सुलतानाच्या दरबारांत खाजा जिहान नांवाचा एक मोठा प्रमाणिक व विश्वासू, राज्यकार्य निपुण असा मुख्य प्रधान होता. त्यानें आपल्या स्वामीच्या राज्याची अव्यवस्था पाहून, राज्यास बळकटी येण्याजोगे नवे कायदे व मुलकाचे नवे विभाग करण्याचा बुद्धिवाद राजास सांगितला, व त्याप्रमाणें राजानेंही व्यवस्था चालू केली. परंतु खाजा जिहानास पुष्कळ शत्रु होते. जे सरदार व दरकदार (वंशपरंपरेने सरकारी काम करणारे) बंडावून आपल्या सत्तेंतला मुलूक बळकावयाच्या लागास आले होते त्यांस त्याचे शहाणपणाचे नियम आवडले नाहींत. त्यांनी कट करून त्याजवर फितुरीचा खोटा आरोप आणिला. आणि सुलतानानें त्याची कांहीं चौकशी न करितां त्यास आपल्या समोर आणवून त्याचा शिरच्छेद केला. हा पुरुष इतका निर्लोभ होता कीं त्याला सरकारांतून ज्या मोठमोठ्या जहागिरी होत्या, त्यांचें उत्पन्न व दर महिन्याच्या वेतनाचें पुष्कळ द्रव्य त्यानें सरकारच्या कार्यार्थ खर्चावें. त्याचा खासगत खर्च फार थोडा असून तो फार साध्या रीतीनें राहत असे. त्याच्या मरणानंतर सुलतानास लवकरच सर्व कृत्रिम समजलें, आणि अविचारानें केलेल्या कर्माचा पश्चात्ताप झाला. त्याची सत्ता दिवसानदिवस कमी होत चालली,

व त्याच्या हातून घडलेल्या पातकामुळें त्याचें मन त्याला रात्रंदिवस खाऊं लागलें, व त्याला हृद्रोग लागला. तो जेव्हां मरायास पडला तेव्हां ओरडून ह्मणे कीं, खाजा जिहान मला फाडून टाकीत आहे.

४. महमद शहाच्या मरणानंतर दोन तीन बाहमनी बादशाह झाले, पण ते केवळ बाहुल्याप्रमाणें होते. जसा एखाद्या इमारतीचा वरचा विस्तार फार वाढत गेला ह्मणजे तिचा पायाही रुंद व मजबूत करावा लागतो, तसाच राज्याचा प्रकार आहे. परंतु बाहमनी राज्याची गोष्ट याच्या उलट होती. त्याचा विस्तार १३० वर्षांत फार झाला, पण त्याच्या मुळांस बळकटी आली नाहीं ह्मणून २० वर्षांत तें पडलें, आणि त्याच्यांतून पांच स्वतंत्र राज्यें उत्पन्न झालीं (१४७८). त्यांतून तीन मात्र पुष्कळ दिवस टिकून प्रसिद्धीस आलीं, त्यांचीं नांवें;—निजामशाई अथवा अहमदनगरचें राज्य; अदिलशाई अथवा विजापूरचें राज्य; कुतुबशाई अथवा गोवळकोंड्याचें राज्य; बाकीचीं दोन, उमदशाई, व बरीदशाई, हीं बहुतकाळ टिकलीं नाहींत. त्यांतून पहिलें अहमदनगरच्या राज्यांत मिळालें, व दुसरें विजापूरकरानें ग्रासलें. ह्या राज्याचे स्थापक बाहमनी सुलतानाच्या पदरचे होते. हे जर एकमेकांशीं स्नेहानें वागते तर त्यांचीं राज्यें बहुत दिवस टिकतीं व शत्रूचा त्यांजवर पैगम चालला नसता.

५. जोंपर्यंत दिल्लीच्या मोंगल बादशाहांनी दक्षिणेच्या राज्यकारभारांत मन घातलें नाहीं तोंपर्यंत हीं तीन

राज्यें जरी आपसांत लढून निर्बळ झालीं होतीं, तरी आपुपलें ठिकाण धरून राहिलीं होतीं. दिल्लीच्या अकबर बादशाहाच्या वेळेस अहमदनगरच्या राज्यांत दोन फळ्या झाल्या होत्या. त्यांत एका पक्षास एक हिंदु मुख्य होता, व दुसऱ्या पक्षास हबशी उमराव होते. मोंगलांस प्रथम दक्षिणेंत हिंदूंनीच आमंत्रण दिलें, त्या आमंत्रणाचा त्यांस पुढें पश्चात्ताप होऊन शेवटीं असा परिणाम झाला कीं अकबराच्या मरणसमयीं (१६०५) त्याच्या ताब्यांत खानदेश, वऱ्हाड प्रांताचा मोठा भाग, निजाम शहाचा काहीं मुलूक व अहमदनगरचा किल्ला इतकें आलें होतें.

६. याच प्रसंगीं मलिकंबर नांवाचा एक चतुर पुरुष अहमदनगरच्या राज्यकारभारांत होता. त्यानें त्या राज्याच्या कोसळायाच्या लागास आलेल्या इमारतीस टेंका दिला. अहमदनगर मोंगलांच्या हातीं गेल्यावर त्यानें दौलताबादेजवळ खिडकी नामक शहर वसविलें व तेथें अदिलशाही राज्याची पुनः स्थापना केली. त्यानें अहमदनगर व वऱ्हाड प्रांत मोंगलांपासून एकदां परत घेतला, व बहुत वेळां त्यांचा पराजय केला. तो जरी सर्वदा लढाईंत गुंतला होता तरी त्याला प्रजेच्या सुखाचे व राज्याच्या हिताचे कायदे कानू करण्यास वेळ मिळत असे तणेंकरून जरी राज्याचा खर्च मोठा होता तरी वसूल पुष्कळ येत असे. मलिकंबराचें नांव अद्यापि दक्षिणी लोकांच्या आठवणींत राहिलें आहे. त्याची भव्य व सुशोभित कबर विजापुरांत आहे.

७. मलिकंबराच्या कारकिर्दींत पैठण एथें मुक्तेश्वर नामाचा प्रसिद्ध कवि जन्मला. त्याने भारताच्या अठरा पर्वांवर ओंव्या केल्या व प्राकृत रामायण रचलें.

८. दिल्लींत अवरंगझीब बादशाहा होईपर्यंत मोंगलानीं दक्षिणेच्या मुसलमानी राज्याच्या नाशाविषयीं विशेष उद्योग केला नाहीं. सन १६८६ मध्यें त्या बादशाहानें मोठें सैन्य जमवून तीन वाटानी दक्षिणेवर स्वारी केली, आणि प्रथम गोवळकोंड्यासीं युद्ध चालविलें. तेथल्या राजानें त्यासीं तह केल्यावर त्याने विजापुरावर स्वारी केली. त्या राजानें त्यास गोवळकोंड्यापेक्षां बहुत दिवस टक्कर दिली. शेवटीं अवरंगझिबाने विजापूरकराचें सैन्य फितविलें, आणि विजापूर शहरास बादशाही सैन्याचा वेढा बहुत दिवस पडला होता त्यामुळें आंतल्या लोकांस अन्नपाण्याचा तोटा पडून तें शहर त्याच्या हस्तगत झालें. (१६८६.) विजापूरचें राज्य बुडविल्यावर अवरंगझिबाने गोवळकोंड्यावर पुनः स्वारी केली, आणि सात महिने त्या बळकट राज्यासीं लढून त्याचाही समूळ नाश केला. या राज्यासीं सल्याचा तह असतां अशा विश्वासघाताची वर्त्तणूक बादशाहाने केली ह्मणून त्याचा पुत्र शहाअलम याने बापाचा निषेध केला, त्यावरून त्याने त्यास साहा वर्षे कैदेंत ठेविलें. नंतर मलिकंबराने नवीन स्थापलेले निजामशाई राज्याचे धनी दौलताबाद एथें अमल चालवीत होते, तेही मोंगलानी जिंकून जमीनदोस्त केले. (१६३४.) याप्रमाणें ह्या तिन्ही

बळिष्ट राज्यांचा नाश झाला. याचें एक मुख्य कारण त्यांच्यांत एकी नव्हती. जेव्हां मोंगल त्यांच्या नाशास उद्युक्त झाले तेव्हां त्यांनी एकमेकांच्या रक्षणार्थ कट करण्याच्या बदल परस्परांच्या नाशार्थ शत्रूचें सहाय केलें, आणि इसापनीतींतल्या कथेंतील वाघाने जशी चार बैलांची जूट मोडून त्यांस खाल्लें, तसें त्या कपटी व धूर्त अवरंगझिबाने त्यांच्यामध्यें फूट पाडून एकएकास उचलून तोंडांत टाकिलें.

९. दक्षिणेंतील मुसलमानी राज्यें बुडण्याच्या व मराठ्यांचा उदय होण्याच्या पूर्वी मध्येंच एक गोष्ट घडली, ती जरी त्या काळीं नदीच्या उगमाप्रमाणें लहान होती तरी पुढें तिचें महत्व तिच्या विस्तीर्ण पात्राप्रमाणें सर्व हिंदुस्थानात पसरलें. युरोपांत विद्या व कलाकौशल्यें वाढूं लागल्यामुळें भूगोलाविषयींचे शोधही तेथील लोकानीं वाढविले. पोर्तुगीस लोकानी केपास वळसा घालून हिंदुस्थानास येण्यास मार्ग काढिला, आणि त्याच लोकांचा सरदार वासको डि गामा हा त्या वाटेने प्रथम या देशीं येऊन कालिकोट बंदरीं उतरला. (१४९७.) पुढें तीन वर्षांनी त्याने गोवें शहर हस्तगत केलें, तें अद्यापि पोर्तुगालच्या राज्याखालीं आहे. त्याच्या मागून महाराष्ट्र देशांत इंग्लिश लोक आले, त्यानी सुरतेस व्यापाराच्या वखारी बांधल्या. पुढें त्यांच्या राजास पोर्तुगालच्या राजाकडून मुंबई बेट आंदण मिळालें. (मार्च, १६६२.) तेथें त्यानीं आपलें ठाणें बसवून त्याच्या रक्षणार्थ थोडेंसें लष्कर आणिलें. मुंबईत १६६४–६५

या वर्षी गोरे शिपाई व सरदार मिळून ११९ मनुष्यें होतीं. ह्या लोकांनीं बहुत दिवसपर्यंत दक्षिणेच्या राजकार्यांत आपला हात घातला नाहीं, व राज्याचा लोभही धरला नाहीं. पोर्तुगीस लोकांनीं मात्र प्रथम मोठें शौर्य दाखविलें व बराच मुलूक काबीज केला, परंतु जसा सूर्यापुढें चंद्राचा प्रकाश लोपून जातो तसा या देशाच्या राज्यरूप क्षितिजावर इंग्लिशांचा उदय होतांच त्यांचें तेज नष्ट झालें. महाराष्ट्र देशांत त्यांपाशीं आतां गोमंतक प्रांताशिवाय दुसरें कांहीं राहिलें नाहीं.

---

# प्रकरण ४.

## मराठ्यांचा इतिहास.

### शिवाजी. १६२७— १६८०

मराठे लोक कसे वाढले – त्यांचीं प्रख्यात कुळें –शिवाजीचे पूर्वज — शहाजी — शिवाजीचा जन्म - त्याचें बाळपण — तरुणपणांतील कामें–पुंडाई –विजापूरकर त्याला जिंकण्याचा यत्न करितात –अफझुल खान –मोंगलांचा यत्न — शाईस्तेखान –शिवाजी सुरत लुटितो – औरंगझेब त्यावर दुसरी फौज पाठवितो — जयशिंग –शिवाजी दिल्लीस जातो – बंदींत पडतो –कसा सुटतो - शिवाजी सिंहासनावर बसतो– त्याचे अष्टप्रधान –त्याचीं आणखी कित्येक लुटालुटीचीं कामें — कर्नाटकांत शेवटची मोहीम — त्याचा मृत्यु –त्याचें गुणवर्णन–त्याचें राज्यचातुर्य — चौथाई व सरदेशमुखी. त्याच्या वेळचे ग्रंथकार.

१. बाहमनी राज्याच्या बखरींत मराठ्यांचें* नांव क्वचित

---

* मराठ्यांची उत्पत्ति रजपूत लोकांपासून आहे. यांचीं व रजपुतांचीं कुळें एक मिळतात, व त्यांमध्यें लग्नादि व्यवहार घडून येतात मराठ्यांचें राज्य होईपर्यंत त्यांस ब्राह्मण शूद्रांत गणित असत, व त्यांस

अढळतें. ते बहुतकरून किल्लेदाराचीं कामें करीत असत, त्याबद्दल त्यांस सुलतानाकडून जहागिरी होत्या, व कधीं कधीं त्यांस दरमहा वेतनहीं मिळत असे. जे मराठे आपणापाशीं थोडी बहुत फौज बाळगून सरकारची चाकरी करीत त्यांस मनसब मिळत असे. मनसब ह्मणजे स्वारांच्या सरदारीचा अधिकार. ज्यापाशीं पांच हजार स्वार असत त्याला पांच हजारांची मनसब, व ज्यापाशीं दाहा हजार स्वार असत त्याला दाहा हजारांची मनसब होती असें ह्मणत. त्या स्वारांच्या खर्चाप्रमाणें त्यांस जहागीर देत असत. हे मराठे युद्धप्रसंगीं आपापल्या मुसलमान धन्याच्या पक्षानें दुसऱ्याच्या लष्करांतील मराठ्यांशीं लढत. ते आपले स्वदेशीय लोक, जातभाऊ, धर्मभाऊ आहेत ह्मणून त्यांच्यावर शस्त्र धरायास मागें पाहत नसत. ते आपल्या कुळांत देखील परस्परांशीं हाडवैर बाळगून लढाया करीत. या कारणामुळें मुसलमानांस जिंकण्यास त्यांस शक्ति किंवा सवड नव्हती. शिरके या नांवाचे मराठे कोंकणांत फार बळिष्ठ होते. त्यांनीं मुसलमानांचें अमलावर कांहीं चालूं दिलें नाहीं.

२. विजापूरकरांच्या राज्यांत मराठे हळू हळू

---

लिहिण्यास वगैरे शिकवीत नसत. परंतु जेव्हां शिवाजीनें छत्रपति असा किताब मिळविला तेव्हां गागा भट्टानें गागाभट्टी या नांवाचा एक ग्रंथ लिहून त्यास क्षत्रिय ठरविलें, व त्यांस जानवीं देऊन ब्रह्मगायत्रीमंत्र जपून वेदोक्त कर्मांप्रमाणें चालण्यास अधिकार आहे असें स्थापिलें. परंतु त्यांचें राज्य आतां नाहींसें झालें ह्मणून ब्राह्मण त्यांच्या एथें वेदोक्त कर्मे करीत नाहींत.—जातिभेद विवेकसार. दु० आवृ० पृ० ५३.

नांवारूपास येत चालले. त्यांस राजे, नाईक, राव असे किताब मिळूं लागले. त्यांत जे सरदार प्रख्यात झाले ते येणेंप्रमाणें:– १ चंद्र राव मोरे; २ राव नाईक निंबाळकर, यांसच फलटण राव ह्मणतात; ३ झुंजार राव घाटगे ४ राव मोरे घोरपडे; ५ डफळे; ६ सांवत बहादूर, वाडीचे देशमुख. अहमदनगरच्या राज्यांतही कित्येक मराठी कुळें नामांकित झालीं, त्यांपैकीं १ राव जाधव व २ राजे भोसले हे होते. ह्या सर्वांत राव जाधवाचें कूळ मोठें पराक्रमी होतें. त्याला निजामशाही सरकारांतून दाहा हजारांची मनसब होती.

३. परंतु ज्याने मराठी राज्याची स्थापना केली असा जो शिवाजी तो भोसल्याच्या कुळांतील होता. त्याचा पणजा बाबाजी भोसला हा उदेपूरच्या राण्याचा पुत्र होता. हें घराणें हिंदुस्थानांतील सर्व राजकुळांत चोख असें प्रख्यात आहे. परंतु बाबाजीची बायको नीच (मानलेल्या) जातीची होती ह्मणून तो आपली अबरू राखण्याकरितां स्वदेशत्याग करून दूरदेशीं जाऊन राहिला. तो खानदेशांतील एका राजाच्या चाकरींत वाढल्यावर त्याने पुण्याजवळ जमीनदारी मिळविली. त्या वेळेस पुणें लहानसें खेडें होतें. त्याचा मुलगा मालोजी याला पुत्र संतान नव्हतें ह्मणून त्याने आपलीं कुळदेवतें महादेव व भवानी यांस नवस केले, पण ते व्यर्थ गेले ह्मणून त्यानें एका पिरास नवस केला. पुढें त्याला पुत्र झाल्यावर त्याचें नांव त्या पिराच्या स्मरणार्थ "शहा" असें ठेविलें. तोच

पुढें शहाजी शिवाजीचा बाप झाला. शहाजीचें लग्न मालोजीचा यजमान राव जाधव याची कन्या जिजीबाई इच्यासीं झालें. ती शिवाजीची आई. शिवाजीचा जन्म सन १६२७ त शिवनेरी किल्ल्यांत झाला. त्याच्या बापास विजापूरकराच्या चाकरीस असतां कर्नाटकांत रहावें लागत असे, ह्मणून त्याने शिवाजीला आपले जमीनदारीच्या गांवीं, ह्मणजे पुण्यांत, दादोजी कोंडदेव या नांवाच्या ब्राह्मणाच्या स्वाधीन ठेविलें. दादोजीने त्याला लिहिणें पुसणें तर शिकविलें नाहीं, परंतु दांडपट्टा वगैरे शिपायाची शिक्षा दिली, व पुराणांतील देवादानवांच्या व कौरवांपांडवांच्या लढायांच्या कथा पुष्कळ सांगितल्या, व त्याच्या मनांत हिंदु धर्मावर विश्वास व भक्ति उत्पन्न केली.

४. शिवाजी १७ वर्षांचा असतां त्याने विजापूर सरकारचा तोरणा किल्ला युद्ध करून घेतला, आणि दादोजी मरण पावल्यावर आपल्या बापाची जहागीर तो वहिवाटूं लागला. त्याने पहिल्याने परराज्यांतील मुलूक घेण्याचा उद्योग केला नाहीं; तर पुण्याच्या आसपास दऱ्याखोऱ्यांत राहणारे जे जंगली मावळे लोक त्यांच्या सहायाने मुसलमानांचे प्रांत लुटून पुष्कळ द्रव्य जमा करण्याचें आरंभिलें. तें द्रव्य त्याने निरनिराळ्या जागीं बिकट किल्ल्यांत नेऊन ठेविलें. तेंच त्याला पुढें लष्कर ठेवण्यास उपयोगी पडलें.

५. विजापूरकरानी शिवाजीच्या उद्धट वर्त्तणुकीचा त्याच्या बापाकडून निषेध करविला, परंतु तो आपली

पुंडाई न सोडितां अधीक दाडगाई करूं लागला. त्याने त्यांचे कित्येक प्रांत घेतले. तेव्हां त्यास वळणावर आण-ण्याकरितां त्यानी शहाजीस कैद केलें, तथापि शिवाजीने आपला क्रम न सोडितां दिल्लीचा बादशाहा शहाजहान यास शरण जाऊन त्याच्या तंत्राने बापास मुक्त केलें. तेव्हां विजापूरकरानी त्याजवर मोठी फौज पाठविली. तिचा त्याने कपटाने नाश केला. त्या फौजेचा मुख्य सरदार अफजूल खान याचा त्याने विश्वासघाताने प्राण घेतला तो प्रकार असा. अफजूल खानाचा गोपिनाथपंत नामें एक ब्राह्मण कारभारी होता त्यास लांच देऊन शिवाजीने वश केला. आणि अफजूल खानास शरण आल्या-सारिखें दाखवून तहाचें बोलणें करण्याकरितां त्याची भेट घेण्याचा योग त्या विश्वासघातकी ब्राह्मणाकडून आणविला, आणि त्याची भेट घेतांना त्याच्या पोटांत वाघनखें खुपसून व त्यावर तरवारीचे वार करून त्याला मारिलें. याप्रमाणें परमनिंद्य कर्म करून त्याने त्या फौजेचा मोड केला. आणि विजापूर सरकाराचे प्रांत लुटीत एकदा त्याच्या राजधानीच्या दरवाजापर्यंत जाऊन पोंचला. त्याचे बहुत किल्ले व कोंकणांतील प्रांतही त्याने हस्तगत केले, विजापूरच्या दरबारांत प्रधान मंडळींत वैमनस्य पडल्यामुळें शिवाजीला आपला स्वार्थ साधण्यास चांगलें फावलें. त्याने त्या सरकारच्या सैन्याचा पुष्कळ वेळा पराजय केला, व शेवटीं पन्नास

हजार पायदळ व सात हजार घोडा ठेवण्याची त्याकडून परवानगी मिळविली.

६. शिवाजीचें बंड मोडायास दक्षिणेंतील राजे जरी असमर्थ होते तरी दिल्लीच्या बादशाहाची नजर त्याजवर होती, कारण तो त्याचाही दक्षिणेंतील मुलूक लुटीत असे, व त्याचे कित्येक किल्ले त्याने घेतले होते. त्यावर मोगलांनी शाईस्तेखान नांवाचा एक सरदार पाठविला. हा सरदार खरोखर शूर होता, परंतु तो मोठा अभिमानी होता ह्मणून शिवाजीस तुच्छ मानून सावधगिरीने वागत नसे. त्याने शिवाजीकडून मोगलांचा बराच मुलूक परत घेतला व शिवाजीचें इनामगांव पुणें तेंही घेऊन ज्या घरांत शिवाजी दादोजीच्या स्वाधीन असतां राहत होता त्यांत येऊन राहिला. तेव्हां शिवाजीने त्याच्याशीं युद्ध करणें सोडून कपट योजिलें. त्या सरदाराच्या सैन्यांतील कित्येक मराठे व मोगल यांस लांच देऊन शाईस्तेखान निजला असतां त्या घरांत आपल्या कित्येक माणसांसुद्धां दिवसा एकाएकीं प्रवेश केला.* परंतु त्या मोगल सेनापतीच्या बायकांनी गडबड केल्यामुळें तो जागृत होऊन खिडकीवाटे उडी टाकून निभावला; त्या

* कोणी परकी मराठे गांवांत येण्याची मनाई होती. पण शिवाजीने शाइस्ते खानाच्या एका मराठी चाकरास लांच देऊन त्याकडून त्याच्या घरच्या लग्नाची वरात गांवांत आणण्याची त्याच्या धन्याकडून परवानगी घेवविली, आणि त्या वरातीबरोबर आपण काहीं लोकांसुद्धां आंत शिरला.

धांदलींत त्याचा मुलगा ठार मेला; आणि शिवाजी व त्याचे लोक पाहरेकऱ्यांच्या सुस्तीमुळें निघून गेले. शिवाजीचें इतकें साहस पाहून शाइस्ते खानास आपल्या हाताखालच्या सरदारांचा विश्वास येईना, आणि तो इतका घाबरला कीं त्यानें बादशाहास विनंतीपत्र पाठवून आपल्यास परत दिल्लीस बोलावून घेतलें.

७. पुढें कांहीं काळपर्यंत शिवाजीला अडवायास कोणी उभा राहिला नाहीं. त्यामुळें त्याचें पुंडावें अधिकच माजत चाललें. त्यानें सुरत शहरावर एकाएकीं धाड घालून तें लुटलें. त्या काळांत सुरत मोठ्या व्यापाराची जागा होती, व तेथें जितकी संपत्ति होती तितकी त्या दिवसांत पृथ्वींतील कोणत्याही एका शहरांत नसेल असें अनुमान केलें आहे. तरी सुरतकरांस आपणावर मराठ्यांचा छापा पडेल असें वाटलें नव्हतें; ते संपत्तीच्या धुरानें अंध झाले होते. इकडे शिवाजीनें अशी युक्ति केली कीं कल्याण व चेऊल हीं गांवें घेण्याचा आकार दाखवून एकाएकीं सुरतेवर चाल केली. तेव्हां तेथचा मोगल सुभेदार गढींत लपून राहिला. मग मराठ्यांस कोणी आडवें आलें नाहीं. तेथें जे इंग्लिश व डच व्यापारी होते त्यांनीं आपल्या वखारी बंद केल्या, आणि मराठ्यांनी साहा दिवस एकसारखें पाहिजे तसें सर्व शहर लुटलें. ह्या लुटींत शिवाजीला एक कोटि द्रव्य मिळालें, आणि जर युरोपियन व्यापाऱ्यांचा खजिना त्याच्या हातीं लागला असता तर त्यास त्याहूनही अधिक

धन मिळालें असतें; परंतु त्या व्यापाऱ्यांनीं मोठ्या शौर्यानें मराठ्यांशीं लढून आपला व त्यांच्याजवळ जे एतद्देशीय व्यापारी होते त्यांचा बचाव केला. हें त्यांचें शौर्य व उदारपण अवरंगझिबास समजल्यावर त्यानें इंग्लिशांस त्यांच्या व्यापारांत जकातीची कांहीं सूट दिली. शहराची लूट होत असतां शिवाजी बाहेर डेरा देऊन राहिला होता, आणि ज्यांवर धन लपवून ठेवल्याचा वहीम येई त्यांचे हात किंवा डोकीं तोडण्याचा हुकूम देत होता, असें एका इंग्रेजास कैद करून त्याच्या समोर नेलें होतें त्यानें लिहिलें आहे ( १६६४. )

८. शिवाजीच्या पारिपत्यास अवरंगझिबानें पुनः एक मोठें सैन्य तयार करून त्याचें अधिपत्य जयशिंग नांवाच्या एका शूर सरदारास देऊन दक्षिणेस रवाना केलें. जयशिंगानें मोठा पराक्रम करून शिवाजीस अगदीं नम्र केला; आणि त्या उभयतांचा तह होऊन असें ठरलें कीं, शिवाजीनें मोंगलांचा सर्व मुलूक परत द्यावा व त्यानें स्वतां बांधलेल्या बत्तीस किल्ल्यांपैकीं वीस किल्लेही द्यावे. इतकें झाल्यावर शिवाजी मोंगलांशीं मिळून विजापूरकरांच्या ताबेदारांशीं लढून त्यांचा मुलूक घेऊं लागला.

९. मोंगलांचें व शिवाजीचें असें सख्यत्व झाल्यावर औरंगझिबानें त्याला दिल्लीस बोलाविलें. तेथें तो गेल्यावर त्याला समजलें कीं, आपण जसें आजपर्यंत दुसऱ्यास ठकवीत आलों तसें आपणास ठकविणार दुनियेंत कोणी आहे. अवरंगझिबानें त्याला बहुमानाची मनसब

वगैरे देण्याचीं वचनें दिलीं होतीं तीं एकीकडे ठेवून त्याला नजरकैदेंत ठेविलें. तेव्हां शिवाजीनें तेथेंही आपली युक्ति लढवून आपली सुटका करून घेतली, तो प्रकार असाः— त्यानें कांहीं दिवस आजारीपणाचें सोंग घेतलें आणि मग बरा झाल्यासारखें दाखवून दिल्लींतील आपली स्नेही मंडळी व फकीर, बैरागी यांस बुरडी पेटारे भरभरून मिठाई पाठवूं लागला. आणि एके दिवशीं आपण व आपला पुत्र पेटाऱ्यांत निजून पूर्वसंकेताप्रमाणें ते पेटारे शहराबाहेर नेवविले, आणि तेथून घोड्यावर बसून दोघेही पळाले. ते दक्षिणेस सुखरूप येऊन पोंचले.

१८ दिल्लीहून परत आल्यावर शिवाजी आपणास राजा ह्मणवूं लागला. त्यानें रायगडीं मोठा समारंभ करून आपणास राज्याभिषेक करविला; आणि आपल्या नांवाचा शक चालू केला. (६ ज्यून, १६७४.) त्यानें आपल्या नांवाचें नाणें पाडण्यास पूर्वींच आरंभ केला होता. त्याला राज्याभिषेक झाल्यावर त्यानें आपल्या अष्टप्रधानांचीं फारशी भाषेचीं नांवें बदलून संस्कृत नांवें ठेविलीं. तीं अशीं:— १ मुख्य प्रधान; २ पंत अमात्य; ३ पंत सचिव; ४ मंत्री; ५ सेनापति; ६ सुमंत; ७ न्यायाधीश; ८ पंडित राव. हीं नांवें फारशींत पेशवा, मजीमदार, सुरनीस, वाकनीस; सरनोबत; दबीर; न्यायाधीश व न्यायशास्त्री अशीं होतीं. पेशवा हा मुख्य प्रधान होताः पंत अमात्य याजकडे वसुलाचें काम होतें; पंत सचिव हा चिटणीस व दप्तरदार होता; मंत्रि हा राजाचा

खासगत चिटणीस व त्याच्या घरचा कारभार पाहणारा असे; सेनापति हा फौजेवर मुख्य असे; सुमंताने परराज्यांच्या वकिलांशीं काम ठेवावें; न्यायाधीश हा मुख्य न्याय करणारा होता; व पंडित राव याने शास्त्रार्थ सांगावा.

११. शिवाजी राजपदारूढ झाल्यावर देखील राजाप्रमाणें गंभीरपणानें वागला नाहीं. त्यापासून इतरांच्या प्रजेस सुख ह्मणून मिळालेंच नाहीं. त्याने राजासनावर बसण्यापूर्वी सुरत शहर पुनः लुटलें, व बसल्यावर निरनिराळ्या वेळीं हुबळी, जालना, धारसीलोर इत्यादि मोठमोठे गांव व व्यापाराच्या पेठा लुटल्या. त्यानें गोवळकोंड्यापुढें एकाएकीं तळ देऊन तेथल्या राजापासून मोठी खंडणी घेतली. परंतु त्याची शेवटली व मोठी मोहीम कर्नाटकांत होती. त्या खेपेस त्याच्या बरावर ७० हजार फौज होती. ह्या स्वारींत त्याने दक्षिण हिंदुस्थानांत एका बाजूस मद्रासेपर्यंत व दुसऱ्या बाजूस श्रीरंगपटनपर्यंत मुलूख लुटला; व आपला सावत्र भाऊ व्यंकाजी यापासून बापाच्या जहागिरीचा व द्रव्याचा वांटा घेतला. * त्यानें मुंबईही घेतली असती, परंतु त्या वेळीं मोगलाच्या एका सरदारास त्याचा पुत्र संभाजी जाऊन मिळाला होता त्या गडबडीमुळें ती गोष्ट तसीच राहिली. पुढें त्याने संभाजीस वश करून घेऊन मोगलाचा एक मोठा खजीना बऱ्हाणपुराजवळ लुटला. आणि तेथून रायगडीं आ-

* व्यंकाजीचे वंशज तंजोर एथें इंग्लिश सरकारचें पेनशन खाऊन नांवाचें राज्य चालवितात.

त्यावर फार प्रवास व जलदीच्या मजला करून थकून तो दुखण्यांत पडला, आणि १६८० चे वर्षाच्या एप्रिल महिन्याच्या ५ व्या तारखेस मरण पावला.

१२. शिवाजीच्या गुणांचें वर्णन नानाप्रकारें केलें आहे. जुन्या समजुतीचे हिंदु लोक त्याला अवतारी पुरुष ह्मणतात. अवतारी ह्मणजे कृष्णादिकांच्या अवताराप्रमाणें तो कपट, लुटारूपणा, क्रूरपणा इत्यादि गुणांचा अवतार होता असें ह्मटलें असतां शोभेल. तो हिंदु धर्माचा मोठा अभिमानी होता, व त्याचें रक्षण करण्याच्या निमित्ताने त्याने मुसलमानांशीं कलह आरंभिला व कपटयुद्ध केलें. त्याच्याठाईं थोर पुरुषाचीं लक्षणें नव्हतीं, कारण त्याने दगाबाजीने व नीचपणाने आपली सत्ता वाढविली. त्याला सत्याची व प्रमाणिकपणाची आवड नव्हती. जसा प्रसंग पडेल तसी त्याने आपली बाजू राखावी. क्षणांत तो मोंगलाचा दासानुदास, क्षणांत तो गोब्राह्मणप्रतिपालनार्थ भवानीचा वरदी पुरुष, क्षणांत विजापूरकरांचा बदा चाकर, याप्रमाणें त्याचीं रूपें बदलत. रक्तपात करण्याविषयीं त्याचें अंतःकरण कधीं दचकलें नाहीं. तो आपले कुटुंबांत सावडा आणि भिडस्त होता. तो आपल्या सोयरेधायऱ्यांचें हित फार वाळगी; पण त्यांचें आपणावर वर्चस्व होऊं नये, ह्मणून फार जपत असे. तो मुसलमानी राजाप्रमाणें ऐषआरामी नव्हता.

१३. शिवाजीने जेवढा मुलूक मिळविला तेवढ्यावर तो

राज्य करण्यास समर्थ होता किंवा नाहीं हें दाखवायास त्याला अवकाश मिळाला नाहीं. त्यानें रानटी जे मावळे लोक त्यांस सुधारून व हातीं धरून आपलें इतकें वैभव वाढविलें ही साधारण गोष्ट नव्हे. त्याने राज्याच्या बंदोबस्ताकरितां कानूकायदे शहाणपणाने केले होते. त्याने, परराज्यापासून खंडणी घेण्याचा जो चौथ व सरदेशमुखीचा हक्क चालू केला तो केवळ मनस्वी होता, ह्मणजे त्याला कोणत्याच धर्मशास्त्राचा अथवा राजनीतीचा आधार नव्हता. चौथ ह्मणजे वसुलाचा चवथा हिस्सा व सरदेशमुखी ह्मणजे दाहावा हिस्सा इतकें द्रव्य शिवाजी जिकडे जाई तिकडे घेई व त्याच्या मागून मोगलांसही त्याची गोडी लागली. पेशव्यानीं तर आपलें राज्य बुडेपर्यंत ह्या विलक्षण खंडणीची लालूच सोडली नव्हती. शिवाजीच्या मरणकाळीं त्यापाशीं पुणें प्रांत, व कर्नाटकांत कित्येक तुटक ठाणीं होतीं. परंतु त्याचें मोठें बळ काय तें डोंगरी किल्यांत होतें, ते त्याने पुष्कळ बांधून त्यांवर शिबंदी ठेविली होती.

१४. त्याच्या राज्याची स्थापना करण्यांत जे त्याला सहकारी होते त्यांचीं नांवें इतिहासांत असावीं हें योग्य आहे. मोरोपंत पिंगळा हा त्याचा पेशवा होता; येसाजी कंक व तानाजी मालसुरे व बाजी फसलकर ह्यानी त्याच्या कित्येक मोठमोठ्या लढाया जिंकिल्या. प्रतापराव गुजर हा त्याच्या स्वारांचा सेनापति होता. त्याच्या मागून हंबीरराव हा सरसेनापति झाला. आनाजी सोनदेव

हा त्याच्या मुलकाचा वसूल जमा करणारा होता.

१५. शिवाजीच्या वेळीं मराठी भाषेंत हिंदु धर्मावर कित्येक ग्रंथ झाले. पुराणांतील कादंबऱ्या प्राकृत भाषेंत लोकांस समजूं लागल्या. हरदासांचें माहात्म्य वाढलें. कथा पुष्कळ होऊं लागल्या. **रामदास, तुकाराम, व वामन पंडित** हे त्या काळचे प्रख्यात कवि होते. त्यांपैकीं पहिल्या दोघां पुरुषांस हिंदु लोक साधु मानितात.

---

# प्रकरण ५.

## संभाजी, राजाराम, आणि ताराबाई.

### १६८०—१७०८.

संभाजी—त्याची क्रूर वर्त्तणूक—त्याचीं युद्धें—कलुशा—संभाजी मोगलाच्या हातीं लागतो—त्याचे हाल व मरण—त्याचे गुण व मराठ्यांचें शौर्य—मराठ्यांची सभा—राजाराम—मराठ्यांचीं स्वतंत्र सैन्यें—अवरंगझेब दक्षिणेंत येतो—राजारामाचा मृत्यु—मराठे देश लुटतात—अवरंगझेबाच्या सेनेची निर्बलता व बेमानपणा.

१. शिवाजीला दोन बायका होत्या, त्यांपासून त्यास संभाजी व राजाराम असे दोन पुत्र होते. मराठी राज्यास असे दोन वारिस उत्पन्न झाले म्हणजे द्वेष व कलह यांस काय उणें आहे? लोकांनी संभाजीला राजा केल्यावर त्यानें फार क्रूरपणाची वर्त्तणूक केली. राजारामास त्यानें कैदेंत टाकिलें, आणि त्याच्या आईचे व तिच्या पक्षाचे जे लोक होते त्यांचे बहुत हाल करून त्यांस ठार मारिलें. त्यांत त्याच्या बापाच्या वेळचे कित्येक विश्वासू

व बहुत कामास पडलेले चाकर व मोठे कामदार होते.

२. संभाजीनें जंजिऱ्याच्या शिद्दीशीं व पोर्टुगीस लोकांशीं बहुत युद्धें केलीं, परंतु त्यांपासून त्यास कांहीं लाभ झाला नाहीं. त्याने आपल्या बापाच्या वेळचे शहाणे व वहिवाटलेले कामदार दूर करून कलुशा नामक एका कनोजा ब्राह्मणाच्या हातीं सर्व कारभार सोपला होता, त्यामुळें शिवाजीने केलेले कायदे रद्द होऊन राज्यांत फार अव्यवस्था झाली; जमिनीचा वसूल बरोबर येईनासा झाला व लष्करास रोजमुरा बरोबर पोहंचण्याची अडचण पडूं लागली; तेव्हां पगाराबद्दल लुटीचा पैका शिपायानी घ्यावा असें ठरविलें.

३. शिवाजीच्या मरणाने अवरंगझिबास अगोदरच आनंद झाला होता, आणि मग मराठी राज्याची अशी धांदल आहे हें समजतांच तो मोठें लष्कर घेऊन दिल्लीहून दक्षिणेंत आला. त्याच्याशीं संभाजीच्या कित्येक सरदारानी कांहीं वेळपर्यंत टक्कर मारली; परंतु संभाजी ऐषआरामांत व मद्यपानांत गुंग होऊन बेफाम राहूं लागल्यामुळें मोगलांच्या हातीं सांपडला. औरंगझिबाच्या मनांत त्याला वांचवायाचें होतें. पण त्याने त्यास मुसलमान होण्यास सांगितल्यावरून त्याने महंमदाची व महमदी धर्माची अशी निंदा केली कीं, बादशाहास तत्काळ रोष येऊन त्याने त्याचा शिरच्छेद करण्याची आज्ञा दिली. त्याच्या हुकुमावरून प्रथम त्याचे डोळे लोखंडाच्या डागणीने भाजले, मग त्याची

जीभ कापली, आणि शेवटीं त्याचें डोकें उडविलें. त्याबरोबर त्याचा आवडता मित्र कलुशा याचाही जीव घेतला. ही गोष्ट तुळापूर एथें घडली. ( १६८९. )

४. संभाजी आपल्या बापाप्रमाणें कांहींसा शूर होता, परंतु तो ऐषआरामी, अविचारी व क्रूर असल्यामुळें त्याची ही दशा झाली. त्याच्या मरणाने मराठी राज्यास धक्का पोंचला असें नाहीं, उलटी त्यास बळकटी आली. संभाजी जरी वाईट होता तरी त्याला मराठे लोक धनी लेखीत असत, आणि त्याची अशी दुर्दशा पाहून त्यांस मोठा आवेश उत्पन्न झाला, आणि शत्रूंवर सूड उगविण्याचा त्यांनी दृढ निश्चय केला.

५. संभाजीला शिवाजी नांवाचा मुलगा होता, तो फार लहान असल्यामुळें सर्वसंमताने राजारामाला राजासनावर बसविलें. त्या प्रसंगीं रायगड एथें मराठे सरदारांची मोठी सभा मिळाली होती. त्या सभेंत आपल्या राज्याची काय स्थिति आहे, त्याला कोण शत्रु आहेत, व त्यांपासून रक्षण करण्याचे कोणते विचार करावे इत्यादि गोष्टींचा विचार व वाटाघाट झाली. त्या विचारांत प्रल्हाद निराजी हा प्रमुख होता. त्याने व दुसऱ्या कित्येकांनी मिळून मोठ्या शहाणपणाचे बेत रचले. संभाजीच्या वेळेस राज्यांत जो घोटाळा झाला होता तो सर्व काढून टाकून डोंगरी किल्ल्यांवर शिबंदी व धान्य व गवत पुष्कळ सांठविलें, आणि मोगलांसीं लढायाला सर्व प्रकारची सिद्धता केली. ह्या राजकार्यांत

मराठ्यांनी जें चातुर्य, ऐक्य, धैर्य व स्वदेशाभिमान दाखविलें तो स्तुतिपात्र होता.

६. इकडे अवरंगझिबास वाटलें कीं राजाराम हा मराठ्यांचा शेवटला राजा आहे ; त्याला जिंकलें ह्मणजे मराठ्यांचें राज्य आपल्या हातीं आलें. परंतु ही कल्पना करण्यांत तो धूर्त बादशाहा चुकला. संभाजीच्या अव्यवस्थित कारभारांतून मराठ्यांस अशी एक चमत्कारिक प्रसरणशक्ति प्राप्त झाली होती कीं तिच्या योगानें मोगलांस मराठ्यांचें मूळ कोणतें व ते कोठें आहेत याचा थांग लागेनासा झाला. जशा वडाच्या पारंब्या जमिनीस लागल्या ह्मणजे त्या प्रत्येक स्वतंत्र वृक्ष होतात, व आपल्या फिडक्या मुळाच्या आधाराची गरज बाळगीत नाहींत तशा मराठी सरदारांच्या टोळ्या सर्व देशांत उभारत चालल्या. जो तो एक घोडें व एक भाला घेऊन त्यांच्यांत मिळूं लागला, व सर्वांनी मोगलांपासून आपला बचाव करून भगवा झेंडा संभाळावा असा आणभाकेचा कट केला. त्या कटांत जे राजारामाच्या पक्षांत मिळाले त्यांतून कित्येकांचे वंशज पुढें मोठे नामांकित वीर झाले. त्यांनी आपल्या पराक्रमानें मोगलांच्या लष्करांत थरकांप सोडला; त्यांच्या मुलकांत चौथ व सरदेशमुखीचे हक्क बसविले व घासदाणा नांवाचा दुसरा एक नवा कर चालू केला. राजारामानेंहि ह्या स्वामिकार्यनिष्ठ इमानी सरदारांस मोठमोठ्या पदव्या देऊन त्यांचा बहुमान केला.

७. अशा प्रकारें जें बलाढ्य व स्वतंत्र सैन्य उत्पन्न

झालें त्याचे अधिपति पवार, थोरात, व अठवले हे होते. त्यांशिवाय संभाजीच्या चाकरींत राहून त्याच्या राज्य-कारभारांत ज्यांनी पुष्कळ सुधारणूक केली व देशाच्या व प्रजेच्या हिताकडे कांहीं प्रकारें लक्ष्य पुरविलें असेही कित्येक होते; त्यांत रामचंद्र पंत, परशुराम त्रिंबक, संताजी घोरपडे,* शंकराजी नारायण, धनाजी जाधव, प्रल्हाद निराजी हे प्रख्यात होते.

८. मराठ्यांचा असा जिकडे तिकडे बंदोबस्त व हुशारी असल्यामुळें मोगलांचा त्यांच्या पुढें उपाय चालेनासा झाला. त्यानी संभाजीच्या वेळीं मराठ्यांपासून जे किल्ले व प्रांत घेतले होते तेही गमावले. अवरंगझिबापासीं जें महादळ होतें तें हत्तीच्या मढ्यांसारखें अवजड, खायास काळ व धरणीस भार असें झालें होतें; त्याचा पोकळ डौल मराठ्यांस लवकरच समजला.

९. संभाजी मोगलानी धरल्यापासून राजारामास त्याचे मंत्री एके ठिकाणीं राहूं देत नसत. तो वारंवार आपली जागा बदलीत असे. त्यामुळें त्याची प्रकृति बिघडली. मोगल तर त्याच्या पाळतीवर रात्रंदिवस होते. तो जालण्याहून मोगलांच्या भयाने पळत येत असतां त्याला फार कष्ट झाले, आणि सिंहगडीं महिनाभर दुखण्यांत पडून

* हा शूर पुरुष तर सात वर्षें पर्यंत मोगलांच्या लष्कराचा काळ होता. मोगलांच्या घोड्याने पाणी न पिलें तर तुला संताजी आंत दिसतो काय असें त्याच्या स्वारानें ह्मणावें

तो मरण पावला त्याच्या वेळीं सातारा मराठ्यांची राजधानी झाली.

१०. राजारामाला दोन बायका होत्या, एकीचें नांव ताराबाई व दुसरीचें राजसबाई. ताराबाई ही वडील होती, तिने आपला पुत्र शिवाजी याला गादीवर बसवून तो लहान होता ह्मणून आपण त्याच्या नांवें कारभार पाहूं लागली. तिच्या कारकिर्दीत निंबाळकर, भोंसले व दाभाडे हे व दुसरे सरदार उदयास आले.

११. ताराबाईंच्या कारकिर्दीपासून तर अवरंगझिबाच्या मरणकाळापर्यंत मराठ्यांनीं नवीन मुलूक घेण्याकडे अथवा आपल्या सत्तेंत जो होता तो संभाळण्याकडे विशेष लक्ष्य दिलें नाहीं; तर मुलूक लुटून उद्ध्वस्त करण्यांत त्यांनी बेशर्थ केली. त्यांनी दक्षिणेंतील शहरें व गांवें लुटून ओस पाडलीं इतकेंच नाहीं, तर ते या प्रसंगीं पहिल्याने नर्मदेच्या पलिकडे गेले. आणि माळवा व गुजराथ या प्रांतांतील बादशाहाच्या रयतेपासून त्यांनीं चौथ व सरदेशमुखीचा पैका घेतला. त्यांच्यामध्यें शिवाजीसारखी स्वराज्य स्थापण्याची इच्छा नव्हती, व परराज्याच्या जुवांखालून निघण्याचाही त्यांनी यत्न केला नाहीं; तर लूट करावी हाच त्यांचा मुख्य उद्देश होता. अवरंगझिबाच्या ठायीं त्याच्या उतार वयांत मराठ्यांची रग जिरविण्याचें सामर्थ्य राहिलें नाहीं. त्याच्या असंख्य सेनेस पुरेसा त्याजवळ पैसा नव्हता, मुलूक ओस पडूं लागल्यामुळें वसूलही फार थोडा येऊं लागला; त्याचे पुत्र

त्याच्या मरणानंतर दिल्लीचें तक्त कोणास मिळेल हा विचार तो जिवंत असतांच करूं लागले; आणि त्याचे सरदार दक्षिणेंत स्वतंत्र राज्यें स्थापण्याच्या मसलती करूं लागले. त्यांतून कित्येक तर दक्षिणेंत घरें दारें करून खुशाल बादशाहाकडला व मराठ्यांकडला पगार खाऊन अजगरासारखे सुस्त पडले होते. यामुळें बादशाहाचा हुकूम तेच मानीतनासे झाले. त्यांची व मराठ्यांची हीच इच्छा होती कीं, हा बुड्ढा बादशाहा असाच बहुत दिवस वांचो, आणि आह्मास रयत लुटावयास मिळो.

## प्रकरण ६.

## शाहू–रामराजा–शाहू महाराज–प्रतापसिंह आणि शाहाजी.

१७०८ — १८४०

शाहू — त्यावर अवरंगझिबाची प्रीति — त्याची सुटका — त्याचें दक्षिणेंत येणें — ताराबाईशीं युद्ध — कोल्हापूरचें संस्थान — अक्कलकोटकर भोंसले यांची मूळपीठिका — बाळाजी विश्वनाथ — शाहूचें व मराठी राजांचें तेज कसें नष्ट झालें — मराठ्यांचा पराक्रम — ब्राह्मणाची स्वार्थसाधक युक्ति — राजाराम — शाहूमहाराज — प्रतापसिंह — शहाजी — व्यंकोजी — शिवाजीच्या वंशाची समाप्ति.

१. मोगलानीं जेव्हां संभाजीस धरलें तेव्हां त्यांच्या हातीं त्याची बायको व मुलगा हीं सांपडलीं. त्यांस अवरंगझिबानें आपल्या कुटुंबांत ठेविलें. त्यांवर बादशा-

हाची कन्या बेगमसाहेब हिची फार प्रीति असे. अवरंगझीबही त्यांसीं ममतेने वागे. संभाजीच्या पुत्राचें नांव शिवाजी होतें पण औरंगझिबाने त्याच्या आजाचा चोरटेपणा मनांत आणून शिवाजी चोर व हा शाह (साव) असें चेष्टेने ह्मणावें, पुढें त्याला तेंच नांव पडलें. शाहू सत्रा वर्षें कैदेंत होता. अवरंगझिबाने त्याचें आपल्या पदरच्या दोघा मराठे सरदारांच्या दोन मुलींसीं लग्न लावून दिलें; व त्यास अक्कलकोट, इंदापूर, नेवासें व सुपें हीं गांवें जहागीर दिलीं. पुढें त्याला सोडून देण्याचें त्याच्या मनांत होतें, परंतु त्याच्या जिवंतपणीं ही गोष्ट घडली नाहीं. त्याच्या मागून अजीमशहा दिल्लीचा बादशाहा झाला, त्याजवळ शाहूने आपल्या मुक्ततेविषयीं अर्ज केला, त्यावरून बादशाहाने त्यापासून आज्ञांकितपणाचें वचन घेऊन त्याला कैदेंतून सोडलें.

२. शाहू दक्षिणेंत आल्यावर त्याला आपली सत्ता स्थापण्यापूर्वीं ताराबाईसीं बरेंच युद्ध करावें लागलें. शेवटीं शाहूला राजपद होऊन ताराबाईला कोलापुरास जाऊन राहणें प्राप्त झालें. तेथें तिनें स्वतंत्र संस्थान स्थापलें. (१७१२.)

३. शाहू दक्षिणेंत येत असतां एका गांवीं ताराबाईच्या पक्षाच्या लोकानी त्याच्या लष्करावर तोफांचे बार केले. तेव्हां तो गांव लढून घेतांवेळीं कोणीएक बायको गांवांतून आपला मूल कडेवर घेऊन बाहेर निघाली आणि शाहू राजापुढें तो ठेवून “हा आपल्या सेवेस अर्पिला” असें

ह्मणाली. शाहूनें तो घेऊन त्या जागीं आपणास प्रथमच जय झाला ह्मणून त्याचें नांव फत्तेशिंग ठेविलें. हा फत्तेशिंग अक्कलकोटकर भोसले यांचा मूळपुरुष व अक्कलकोटचा पहिला राजा झाला.

४. शाहूनें स्वतां कांहीं मोठा पराक्रम करून राज्य मिळविलें किंवा आपला आजा शिवाजी याच्याप्रमाणें मराठ्यांची सत्ता वाढविली असें नाहीं. तो लहानपणापासून मोगलांच्या रंगमहालांत असल्यामुळें चैनबाजींत आपलें आयुष्य दवडायास शिकला होता. जनावरांची पारध करणें, पांखरें धरणें, व गळानें मासे धरणें हें त्यास फार आवडे, व आपले प्रधान आपल्या हुकुमाबाहेर चालत नसत एवढें पाहून तो फार खूश होत असे. त्या प्रधान मंडळांत ब्राह्मणांचें महत्व उत्तरोत्तर वाढत गेलें. त्या ब्राह्मणांत आबाजी पुरंदरे, सासवडचा कुळकरणी, व बाळाजी विश्वनाथ भट, श्रीवर्धनचा कुळकरणी, हे मुख्य होते. बाळाजी विश्वनाथ हा शाहूचा पेशवा झाला ( १७१४) व पुरंदरे हा बाळाजीचा मुतालीक झाला. हे ब्राह्मण आपल्या जातीप्रमाणें मोठे कारस्थानी, लोभी, स्वार्थी व आर्जवी होते. त्यांनी शाहूला इतका मोहून फसविला कीं तो त्यांच्या हातांत बाहुल्याप्रमाणें झाला आणि त्याचे वंशज पेशव्यांच्या चाकरांप्रमाणें व पेशवे त्यांच्या धन्याप्रमाणें पुढें झाले. असें आपल्या आळशी व ख्यालखुशाली भोगण्याच्या स्वभावानें पुढें होईल हें शाहूला कळलें नव्हतें. देवाचें शास्त्र ह्मणतें कीं, "हे देशा, ज्या तुझा राजा पोर आहे, व तुझे अधिपति

सकाळीं खातात ( ह्मणजे ऐषआरामानें राहतात ) त्या तुला हायहाय ( उप० १०.१६ )

५. शाहूच्या कारकिर्दीची समाप्ति होण्यापूर्वी ज्या गोष्टी मराठी राज्यांत घडल्या त्यांत ध्यानांत ठेवण्याजोगें इतकेंच आहे कीं, त्याच्या वेळीं मोगल लोक मराठ्यांचा विशेष मान ठेवीत व दिल्लीच्या कारभारांत मराठ्यांचा प्रवेश होऊन त्यांचें वजन पडूं लागलें, व मोगल त्यांचें सहाय घेऊं लागले. पूर्वी शिवाजीस मोगलानीं दिल्लींत कैद केलें होतें व तेथून त्याला पळून यावें लागलें, पण आतां बाळाजी विश्वनाथ यानें दिल्लीहून शाहूचें कुटुंब कैदेंतून सोडवून आणिलें; व बादशाहासीं तह करून दक्षिणेंत व इतर ठिकाणीं चौथ व सरदेशमुखी व स्वराज्य* याच्या सनदा घेऊन दिल्लीच्या दरबारांत आला.

६. दिल्लीहून परत आल्यावर बाळाजीनें वसुलाच्या बंदोबस्ताविषयीं कांहीं नवे कायदे केले. तो प्रकार ध्यानांत आणिला असतां त्यांत असा मतलब दिसतो कीं, ज्यांस लिहितां वाचतां येत होतें असे जे ब्राह्मण त्यांनी श्रेष्ठ व्हावें, आणि अक्षरशत्रु जे मराठे त्यांनी त्यांच्या स्वाधीन होऊन वागावें.

७. शाहूच्या मरणानंतर राजारामाचा पुत्र शिवाजी

* मराठ्यांस वतनाचा फार लोभ आहे. पोटास तुकडा व ढुंगणास चिंधूक जरी मिळेनासें झालें तरी ते वतन सोडणार नाहींत. बाळाजीनें हा त्यांचा लुब्ध स्वभाव पाहून तेवढ्यावरच त्यास तृप्त केलें. स्वराज्य ह्मणजे शिवाजीच्या वेळचा मुलूख; त्यांतून त्यानें कांहीं शाहूस वतन करून दिलें.

याचा पुत्र रामराजा हा गादीवर बसला. तो राजा असून ब्राह्मणांच्या हातांत कैदीदाखल होता. मराठ्यांचें सर्व राज्य पेशवे चालवीत, केवळ पेशव्याच्या पदवीचीं वस्त्रें देण्याचा अधिकार मात्र त्याकडे ठेविला होता. राज्यप्रकरणीं कोणतीहि महत्वाची गोष्ट त्याच्या हातीं राहिली नव्हती. सरदेशमुखी ह्मणजे ऐनवसुलांतून शेंकडा दाहा रुपये एवढें मात्र राजास वेतन मिळत असे.

८. रामराजानें आपलें आयुष्य बंदांत कंठल्यावर त्याच्या पोटीं संतान नव्हतें ह्मणून थोरल्या शिवाजीच्या चुलत्याच्या वंशांतील एका गरीब पाटलाचा मुलगा दत्तक घेतला. त्याचें नांव त्यानें शाहू महाराज ठेविलें. शाहू १८०३ मध्यें मरण पावला. त्याच्या जागीं त्याचा पुत्र प्रतापसिंह साताराचा राजा झाला. तोही पेशव्यांचा बैठा पगार खाऊन पडला असे. पुढें पेशव्यांचें राज्य इंग्लिशानीं घेतल्यावर त्यानीं त्याला सुमारें चौदा लक्षांचा मुलूक देऊन मोठ्या समारंभानें गादीवर बसविलें (१८१८.) तो उपकार त्यानें स्मरून जसें वागावें तसें न करितां गादीवर बसतांना जीं तहाचीं कलमें पाळीन ह्मणून वचन दिलें होतें तीं तो मोडूं लागला. तेव्हां मुंबई सरकारानें त्याला पुष्कळ वेळा बुद्धिवाद सांगितला, पण तो शेवटीं व्यर्थ जाऊन त्याला गादीवरून काढावें लागलें. त्याला १८३९ त काशीस रवाना करून त्याचा भाऊ शाहाजी यास गादीवर बसविलें. त्या

राजानें आपल्या राज्यांत सती बंद केली आणि दुसरीं-हि कित्येक लोकहिताचीं कामें केलीं.

९. शाहाजी १८४८ त मरण पावला. त्यानें एक मुलगा दत्तक घेतला होता, त्याचें नांव व्यंकोजी उर्फ जंगली राजा. त्याकडे राज्यकारभार कांहीं नव्हता, कारण त्या वेळीं इंग्लिशानें जिंकलेले हिंदुस्थानांतील राजे रजवाडे यांस राज्य चालविण्या करितां दत्तक घेण्याची मनाई होती. व्यंकोजी १८६४ सालीं अहमद नगर एथें निवर्तला. आणि त्याच्या बरोबर शिवाजी राजाच्या वंशाचा शेवट झाला.

---

# प्रकरण ७.

## पेशव्यांचा इतिहास.

## बाळाजी विश्वनाथ १ ला बाजीराव.

### १७१४–१७४०.

बाळाजी विश्वनाथ दिल्लीच्या कारभारांत शिरतो—कानोजी आंग्रया—निजाम उल्मुल्क—महाराष्ट्र कवी—श्रीधर—मोरोपंत—१ ला बाजीराव-त्याची राजनीति—खंडेराव दाभाडे—दमाजी गायकवाड—त्रिंबकजी दाभाडे—तळेगांवची दक्षिणा पुण्यांत चालू होती—दक्षिणा प्रैज कामिटि-मराठी लष्कर दिल्लीस जातें—मराठ्यांचे लाभ—मराठी कुळें—होळकर—शिंदे—गायकवाड—धारचे पवार—नागपुरचे भोसले—इंग्लिश-फ्रेंच—पोर्टुगीज—चिमणाजी आपा—मराठी कवि.

१. दक्षिणेंत मराठ्यांच्या राज्यावर भटांनीं भट्टी कावा चालवून जी आपली सत्ता बसविली तिचा पहिला उपभोग

घेणारा बाळाजी विश्वनाथ हा होता; त्याने साहा वर्षें पेशवाईचा अधिकार चालविला तेवढ्या स्वल्पकाळांत हिंदुस्थानांत मोठ मोठ्या उलाढाली झाल्या. मराठ्यांच्या राज्यास* पुष्कळ बळकटी आली. दिल्लीच्या राज्याची सत्ता सैयद नामक दोघां भावांच्या हातीं जाऊन ते बादशाहास कळसूत्री बाहुल्याप्रमाणें नाचवूं लागले, त्या सैयदांस बाळाजीनें अनुकूळ करून घेऊन तो मोठ्या लष्करासहित दिल्लीस गेला. त्याने तेथें काय केलें तें मागल्या प्रकरणीं सांगितलें आहे.

२. जे मराठे सरदार या वेळेस उत्कर्ष पावले त्यांत कानोजी आंग्र्या हा फार बळकट होता. त्याने इंग्लिशांच्या व्यापारास फार त्रास दिला. त्यास जिंकण्याकरितां इंग्लिश व पोर्टुगीस यानी दोनदां यत्न केले पण ते व्यर्थ गेले. डच लोकानीहि त्याचा किल्ला विजयदुर्ग यावर हल्ला केला, पण त्यांत त्यांस जय मिळाला नाहीं. कानोजी हा चांचेपणा करीत असे, ह्मणजे त्याने व्यापाऱ्यांचीं गलबतें लुटावीं. तो पेशव्यांस चौथाईबद्दल लुटीच्या मालांतून विलायती तोफा, बंदुका दारूगोळा वगैरे युद्धोपयोगी साहित्य पुरवीत असे.

३. याप्रमाणें मराठे उत्कर्ष पावत असतां व मोगलांचा अपकर्ष होत असतां मराठ्यांशीं चढोवढी करणारा असा एक नवा सत्ताधारी दक्षिणेंत उत्पन्न झाला. त्याचें

*ह्या प्रकरणापासून पुढें मराठ्यांचें राज्य ह्मणजे ब्राह्मणी राज्य, पेशवाई किंवा त्यांच्या संबंधानें जे मराठे वाढले त्यांचें राज्य असें समजावें.

नांव निजाम उल्मुलुक* त्याने दक्षिणेंत येऊन स्वतां राज्याचा झेंडा उभारिला, तेणेंकरून जो मुलूक घेण्यास मोगल शंभर वर्षें सतत प्रयत्न करीत होते तो अक्षयी व्यर्थ गेला. ह्या निजामाचा वंशज अद्यापि दक्षिणेंतील हैदराबाद एथें अधिकार चालवीत आहे. मराठे लोक निजामास नबाब ह्मणतात.

४. बाळाजीच्या वेळेस महाराष्ट्र देशांत मोरोपंत नामें प्रख्यात कवि जन्मला. (१७२९) आणि श्रीधर नामें कवि मरण पावला. श्रीधराने हरिविजय, पांडवप्रताप, रामविजय, शिवलीलामृत हे ग्रंथ रचले. मोरोपंत १ल्या बाजीरावाच्या वेळीं प्रौढ दशेंत येऊन कविता रचूं लागला. त्याच्या आर्या सर्व महाराष्ट्र देशांत प्रसिद्ध व मान्य आहेत.

## १ ला बाजीराव.

५. बाळाजीला दोन पुत्र होते, बाजीराव व चिमणाजी आपा. पेशव्याचा अधिकार आपल्या कुटुंबांत वंशपरंपर चालावा असी बाळाजीने शाहूपासून सनद मिळविली होती. त्यावरून शाहूने बाजीरावास आपला पेशवा केला. बाजीराव हा बापासारखाच स्वार्थसाधक

* निजाम उल्मुलुक हा करड्या स्वभावाचा होता आणि बादशाहा व त्याचें मंडळ यांस तर हास्य विनोदाची फार प्रीति होती, ह्मणून त्यांस त्याचा सहवास आवडत नसे. आणि जेव्हां त्याने बादशाहाचा थट्टामस्करीचा स्वभाव बदलण्याचा यत्न केला तेव्हां त्याला बादशाहाने आपल्याजवळून काढून दूरच्या मोहिमेवर पाठविलें. त्या मोहिमेचा परिणाम वर सांगितल्याप्रमाणें झाला.

होता. त्याने मराठ्यांची राज्यकारभारांतील सत्ता कमी करण्याचा क्रम चालविला. त्याचा हेतु हाच होता कीं, राजा हा निमित्तास मात्र असावा, आणि आपण राज्याचें वैभव व सुख भोगावें. आणि ब्राह्मणजातीचा हा स्वभावच आहे कीं आपण चाकर ह्मणवीत असतां यजमानावर धनीपण चालवावें. बाजीराव शूर व साहसी होता. त्याने परराज्यें घेण्यास जे जे उपाय केले त्या सर्वांस निजाम उल्मुलुक आडवा येई, पण शेवटीं पेशव्याचाच जय होई. त्याचा भाऊ चिमणाजी आपा हा त्याच्या सर्व कारभारांत व लढायांत त्याचा उजवा हात होता. तो बुद्धिमंत, चतुर व शूर होता.

६. बाळाजी विश्वनाथ मरण पावल्याच्या सुमारास शाहूचा सेनापति खंडेराव दाभाडे हाहि निवर्तला. तो मरण्याच्या अगोदर त्याच्या हाताखालचा सरदार दमाजी गायकवाड याने राजाच्या कित्येक लढायांत मोठें शौर्य दाखविलें, ह्मणून दाभाड्याच्या शिफारशीवरून शाहूने त्याला सेनापतीचा दुय्यम करून समशेरबहादर असा किताब दिला. हाच दमाजी वडोद्याचे गायकवाडाचा मूळ पुरुष.

७. खंडेराव दाभाड्याच्या मागून त्रिंबकजी दाभाडा सेनापति झाला. त्याचें व बाजीरावाचें वांकडें होतें, ह्मणून निजामाने दाभाड्यास फूस देऊन व कुमकेची आशा दाखवून त्या उभयतांचा युद्धप्रसंग आणिला, त्यांत दाभाडे याचा बाजीरावाने अगदीं मोड केला, व तो

दाभाड्याही युद्धांत पडला.* ही मोठी निकराची लढाई बडोद्याजवळ झाली (१७३१,) आणि तेव्हांपासून बाजीरावाची सत्ता दक्षिणेंत पुरती बसली. निजामाचें कृत्रिम पेशव्यास कल्लथावर त्या दोघांचें बहुत वेळां युद्ध झालें, त्यांत दोनदां तर निजामास मराठ्यांनी चहूंकडून वेढून मोठ्या अडचणींत घातला व त्यापासून आपल्या खुशीप्रमाणें तह करून घेतल्यावर त्याला सोडलें.

८. ह्या लढायांकडून बाजीरावाची कीर्ति हिंदुस्थानभर पसरली. त्याच्या समोर कोणी उभा राहण्यास समर्थ नव्हता. त्यानें आपलें लष्कर दिल्लीच्या दरवाज्यापर्यंत नेऊन पोंचविलें व बादशाहापासून गुजराथ व मालवा ह्या प्रांतांची चौथ व सरदेशमुखी मिळविली, व शेवटीं माळव्याचा अधिकारही संपादला.

९. ह्या बाजीरावाच्या कारकिर्दींत कित्येक मराठी कुळें उदयास आलीं, त्यांत मल्हारराव होळकर, इंदूरच्या संस्थानाचा स्थापक, राणोजी शिंदा ग्वालेरच्या संस्थानाचा मूळ पुरुष, व पिलाजी गायकवाड, हे तिघेही गरीब कुळांतले होते. मल्हारजी हा बाजीरावाच्या लष्करांत

* सेनापतीच्या मरणानें हिंदु लोकांस व विशेषेंकरून भिक्षुक ब्राह्मणांस फार वाईट वाटलें. कारण तो आपल्या इनाम गांवीं ह्मणजे तळे गांवीं प्रतिवर्षीं हजारों ब्राह्मणांस कित्येक दिवस भोजन घालीत असे. बाजीरावानें लोकांचीं मनें आपणाकडे लावून घेण्यासाठीं ही चाल पुण्यांत चालू केली, व त्या ब्रह्मसमाजांत शास्त्री, वैदिक यांची परीक्षा घेऊन त्यांस द्रव्य देऊं लागला. त्याच्या मागून जे दुसरे पेशवे झाले त्यांनीही ती चाल चालविली, तिला दक्षिणा असें नांव पडलें. तिच्याच द्रव्यानून हल्लींची सुधरलेली दक्षिणकामिटी उत्पन्न झाली.

शिलेदार होता* तो जातीचा मराठा धनगर. त्याचा बाप होळ नामक निरेच्या कांठीं एक गांव आहे तेथला चौगुला होता. † राणोजीचे पूर्वज सातार प्रांतांतील कन्हेरखेड गांवचे पाटील होते. त्यांच्या कुळांतील एका कन्येशीं अवरंगझिबानें शाहूचें लग्न लाविलें होतें. पण या वेळेस तें कूळ इतकें गरीब झालें होतें कीं, राणोजी शिंदा हा बाजीरावाजवळ जोडा उचलायाची चाकरी धरून राहिला होता. असें सांगतात कीं तो ह्या हलक्या कामांत देखील विश्वासूपणानें वागत आहे असें बाजीरावानें पाहून त्यानें त्याला पुढें मोठीं कामें सांगितलीं. "जो आपल्या धन्याला जपतो तो सन्मान पावेल" नीति. २७.१८. गायकवाडाविषयीं मागें सांगितलेंच आहे; एथें इतकेंच सांगितलें पाहिजे कीं दमाजी आपली पदवी व किताब भोगायास फार दिवस वांचला नाहीं. त्याच्या मागून पिलाजी गायकवाड ह्यानें पुष्कळ लढाया केल्या व तो सेनाखासखेल असा अणखी एक किताब पावला. धारच्या पवाराचा उदय ह्याच सुमारास झाला. त्याचा मूळ पुरुष उदाजी पवार. नागपूरचे भोसल्याचा मूळपुरुष परसोजी भोसला हा रामराजाच्या वेळेस प्रसिद्धीस आला होता, पण बाजीरावाच्या वेळीं मात्र त्याचा वंशज रघुजी भोसला याला शाहूकडून वऱ्हाड प्रांताची सुभेदारी व सेना साहेब सुभा असा किताब मिळाला.

---

* शिलेदार ह्मणजे जो आपल्या पदरचा घोडा बाळगून सरकारची चाकरी करितो तो.

† चौगुला पाटलाच्या हाताखालीं असतो.

१०. बाजीरावाच्या अमलांत महाराष्ट्र देशांत इंग्लिश, फ्रेंच, डच व पोर्टुगीस हे युरोपियन लोक होते. त्यांतून पोर्टुगीस लोकांनी राज्यलोभ धरून मराठ्यांशीं विरोध चालविला होता, परंतु ते बलहीन होऊन त्यांनी आपल्या ताब्यांतला बहुत मुलूक गमावला. त्यांच्याशीं चिमणाजी आपाने लढाया करून आपल्या लोकांत नांव मिळविलें.

११. ह्या काळांत प्रख्यात मराठी कवि अमृतराय हा होता. त्याने बहुत पदें व कटिबंध रचले.

---

# प्रकरण ८.

## बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब.

### १७४०–१७६१.

बाळाजी बाजीरावाने ब्राह्मणांची सत्ता कशी वाढविली– रघुजी भोसला– पुणें पेशव्यांची गादी होती.– बाळाजीचा स्वभाव – त्याचे मदतनीस– सदाशिव राव व रामचंद्र बाबा शेणवी हे रयतेच्या हिताचे कायदे करितात—पेशव्याच्या हिंदुस्थानांत स्वाऱ्या– रघुनाथ रावाची पहिली स्वारी–दुसरी स्वारी—पानपतची लढाई— अफगाण लोकांचा क्रूरपणा— नानासाहेबाचा मृत्यु– इंग्लिशांनी पेशव्यांस कोणती मदत केली—देशाच्या बंदोबस्ताचे कायदे.

१. पहिल्या बाजीरावास तीन पुत्र होते, त्यांतून एक लहानपणींच मेला; जे राहिले त्यांतून एकाचें नांव बाळाजी, ह्याला कोणी नानासाहेबही ह्मणतात. दुसरा रघुनाथ राव. बाळाजी हा बापाच्या जागीं कारभार पाहूं लागला. त्याच्याही कारकिर्दींत ब्राह्मणांची सरशी

होती. त्याने पोर्टुगीस लोकांकडून जिंकून घेतलेल्या मुलखाची आपणास शाहू राजाकडून सनद करून घेतली; आणि गुजराथ खेरीजकरून नर्मदेच्या उत्तरेकडील सर्व प्रांतांत वसूल जमा करण्याचा व खंडणी घेण्याचा अधिकार आपणाकडेसच लावून घेतला.

२. बाळाजीस रघुजी भोसला हा प्रतिकूळ होता. प्रथम त्याने त्यास पेशव्याचें पद मिळूं नये ह्मणून पुष्कळ प्रयत्न केला, तो शेवटास न गेला ह्मणून त्याने पेशव्याच्या मुलकावर पुष्कळ स्वाऱ्या केल्या, व त्याचा स्नेही दिल्लीचा बादशाह याचा बंगालप्रांत लुटला. तेव्हां बादशाहाने पेशव्याच्या मदतीने रघुजीस बंगाल्यांतून हाकून दिला. परंतु बाजीरावास रघुजी आपणास आवरतो असा विश्वास येईना व दुसरेही कित्येक मराठे सरदार आपणास प्रतिकूळ आहेत, असें पाहून शाहूस मध्यस्थ करून रघुजीस बंगाल, बहार व ओंद हे प्रांत दिले, आणि पश्चिमेकडला देश आपणास ठेविला. रघुजीचा कलह मिटल्यानंतर व शाहूच्या मरणापूर्वी कांहीं दिवस पेशव्याने सर्व मराठे सरदार, जहागीरदार व मानकरी यांस राजाच्या कार्यानिमित्त पुण्यास बोलाविलें. तेव्हांपासून पुणें मराठी राज्याची मोठी राजधानी झाली. ( १७५०. )

३. बाळाजी हा जरी राज्यप्रकरणांत चतुर होता तरी तो स्वार्थ साधण्याच्या वेळीं कपट करीत असे. तो ऐषआरामी व आळशी होता. त्याने आपलीं कामे दुस-

त्यावर हवालावीं. त्याचा चुलत भाऊ सदाशिव राव भाऊ (चिमणाजीचा पुत्र) व सखा भाऊ रघुनाथ राव हे त्यांच्या फार उपयोगीं पडले. त्यांस हातीं धरून त्याने पेशव्यांचें घराणें वाढविलें. सदाशिव राव कारभार पाहत असतां त्यांच्या हाताखालीं रामचंद्र बाबा शेणवी हा दिवाण होता. हे यजमान व सेवक उभयतां पराकाष्ठेचे लोभी व लांचखाऊ होते. परंतु त्यांनी मुलखाचा बंदोबस्त चांगला राखला होता. रामचंद्र बाबाने ठरविलेले कायद्यांकडून गांवकीला बळकटी आली; व पूर्वीं ज्या लुटालुटी होऊन रयतेस वारंवार त्रास होत असे त्या बंद होऊन बहुत दिवस देशांत स्वस्थता झाली.

४. ह्या पेशव्याने हिंदुस्थानावर तीनदां मोहीम केली, त्यांत पहिल्या मोहिमेचें काम रघुनाथ रावास सांगितलें होतें. त्या स्वारीपासून विशेष लाभ झाला नाहीं; रघुनाथ राव कर्जभरू होऊन परत आला. त्यावरून सदाशिव रावाने त्याला बोल लाविला. मग दोघांचें पुष्कळ भांडण झाल्यावर पुण्याच्या दरबारांत असें ठरलें कीं, रघुनाथ रावानें मुलकी काम पाहावें व सदाशिव रावाने उत्तरेकडे स्वाऱ्या कराव्या. तरी १७५८ त हिंदुस्थानांत पेशव्याची दुसरी स्वारी रघुनाथरावाने केली. त्या वेळीं तेथें अफगाण लोकांचा बादशाहा अहमदशाहा अबदाली हा पुनः येऊन गेला होता. त्याच्या येण्याने दिल्लीच्या लोकांचे फार हाल झाले होते, आणि जो नांवाचा बादशाहा होता त्याच्या कारभाऱ्यांत वांकडें पडलें होतें. अशा

संधींत रघुनाथरावास मोगलांच्या कारभारांत शिरण्यास सवड सांपडली. त्याने पंजाबापर्यंत चाल करून तेथें अ-बदालीचा सुभेदार होता त्याला हाकून लाविला, आणि मोठ्या जयसमारंभाने आपण लाहोरच्या दरवाज्यामधून आंत शिरला. याप्रकारें मराठ्यांची सत्ता सिंधुनदीच्या कांठीं स्थापित करून रघुनाथराव दक्षिणेंत आला; परंतु एवढा जय मिळविण्यास त्याने सरकारावर ऐशीं लक्ष क-र्जाचें टोपलें केलें.

५. इकडे अहमदशाहास हें वर्त्तमान समजतांच त्याने मोठें सैन्य मिळवून दिल्लीवर पुन: स्वारी केली, आणि मराठ्यांस पंजाबांतून हाकून दिलें. एवढ्या पराजयाने मराठे उगीच राहिले असते तर त्यांचा जो पुढें मोठा नाश झाला तो कदाचित चुकला असता. परंतु गर्वा-च्या पाठीवर जो चढतो तो लज्जेच्या पोटाखालीं पडेल, ह्या ह्मणीप्रमाणें घडून आलें. ह्याच प्रसंगीं मराठ्यांनी दक्षिणेंत निजामावर जय मिळवून मोठा लाभ प्राप्त करून घेतला होता तेणेंकरून सदाशिवरावाचें मन हर्षित होऊन गर्वाने फुगलें होतें. त्याने अफगाणांच्या स्वारीचें वर्त्तमान ऐकतांच पेशव्यास ह्मटलें कीं, मला व विश्वासरावाला (पेशव्याच्या वडील पुत्राला) स्वारीवर नेमिलें असतां आह्मी अफगाणांस हिंदुस्थानाच्या हद्दीबाहेर हा-कून देऊं. बाळाजीने तें अभिमानाचें बोलणें तत्काल मान्य करून सेनेची सिद्धता करण्यास हुकूम दिला. ही मराठ्यांची हिंदुस्थानावर तिसरी स्वारी.

६. ह्या महायुद्धसंग्रामास सर्व मराठी सरदार, मानकरी, संस्थानिक व जाहगीरदार यांनी आपापल्या सामर्थ्याप्रमाणें फौजेची मदत केली. शिंदे, होळकर, गायकवाड, जाटांचा राजा हे तर आपापल्या सैन्याबरोबर स्वतां युद्धास निघाले. त्या सर्वांच्या एकत्र झालेल्या फौजेची संख्या १५,००० पायदळ ५५,००० स्वार २०० तोफा, इतकी होती. याशिवाय बाजारबुणगे (लष्कराबरोबर असणारे वाणी उदमी बायका वगैरे मनुष्यें) थोडीच तरी दोन लक्ष असतील. ह्या लष्कराचा थाट असा होता कीं अवरंगझिबाच्या वेळेपासून तशी स्वारी कोणी पाहिली नव्हती. अबदालीची फौज सुमारें तितकीच होती; त्याचे स्वार मात्र मराठ्यांच्या स्वारांहून कांहीं कमी होते. परंतु मराठ्यांच्या लष्करांत एकी नव्हती. सदाशिवराव हा हट्टी स्वभावाचा व स्वाभिमानी होता; त्याने आपल्याहून शहाण्या सरदाराची मसलत ऐकिली नाहीं. ते प्रथम दिल्लीवर गेले, आणि तें शहर हस्तगत केल्यावर पर्जन्यकाळ सरेपर्यंत तेथेंच राहिले. त्याच्या व अबदालीच्या मध्यें केवळ यमुना आडवी होती. परंतु मराठ्यांस वाटलें कीं, अफगाण नदी उतरून येणार नाहींत ह्मणून ते गाफील राहिले. अहमदशाहानें तहाच्या निमित्तानें मराठ्यांस पुष्कळ भुलथापी दिल्या; आणि त्यांच्या लष्करास अन्नपाण्याचा तोटा पडेल असा बंदोबस्त केला. नंतर तो पाऊसकाळांतच एकाएकीं नदी उतरून मराठ्यांच्या जवळ येऊन ठेपला. त्याने

त्यांजवर जो पहिला हल्ला केला तो मराठ्यांनी मागें हट-विला; तेवढ्यावरूनच त्यांस मोठें स्फुरण झालें; व त्यांच्या कोठींत धान्याचा तोटा पडला होता ह्मणून शत्रूसीं समोरासमोर लढण्याचा त्यानी एकदम निश्चय केला.

७. मराठ्यांस असें वाटलें होतें कीं, आपणास पूर्वीं जसा सर्व प्रसंगीं जय मिळत असे तसा या वेळेसही मिळेल. त्यानी आपला तोफखाना पुढें चालविला, आणि मोठ्या जोराने अफगाणांच्या लष्करावर पुरासारखे ते लोटले. इकडे अबदालीच्या सेनापतीने प्रथम त्यांस आपल्या अंगावर येऊं दिलें, आणि मग एकदम त्यांजवर हल्ला केला. त्याच्या डोंगरवटींतल्या बळकट घोड्यां-पुढें दाक्षिणी लुकड्या तट्टांचा क्षणभरही टिकाव निघाला नाहीं. पहिल्याच तडाख्यास मराठ्यांची फळी फुटली, आणि त्यांचें सैन्य उधळून चहूंकडे रानोमाळ पसरलें, त्यांतून चौथा हिस्साही परत स्वदेशीं येऊन पोंचला नाहीं. शत्रूस २२,०००कैदी,५०,००० घोडा व अतोनात लूट सांपडली. समरंगणीं पडलेल्या सरदारांत विश्वासराव व सदाशिवराव हे होते. मल्हारराव होळकर व दमा-जी गायकवाड हे तर लढाईस आरंभ होण्यापूर्वींच पळा-ले. जे अफगाणांच्या हातीं सांपडले त्यांतून बायका व मुलें त्यानी वांटून घेतलीं व पुरुषांच्या दावणी करून त्यांचीं डोकीं तोडून त्यांचे ढीग आपल्या डेऱ्यापुढें घात-ले. असा क्रूरपणा करून त्यानी आपला जंगलीपणा जगापुढें प्रगट केला, व मनुष्यजातीस कलंक लाविला.

हा लढाई पानपताजवळ झाली, (जानेवारी ६, १७६१) ह्मणून तिला पानपतची लढाई ह्मणतात. एखादी मोठी कत्तल होऊन कोणाचा अगदी विध्वंस झाला ह्मणजे त्याचें पाणपट झालें असा ह्या लढाईवरून भाषणसंप्रदाय पडला आहे.

८. नानासाहेबास हें दुःखकारक वर्त्तमान समजल्यावर तो चिंतारोगानें थोड्या महिन्यांनी पुणें एथें पर्वतीच्या देवळांत मृत्यु पावला. हें देऊळ त्यानेंच बांधलें होतें. पानपताच्या लढाईपूर्वीं मराठ्यांच्या राज्याचा कळस झाला होता. पण ही अनर्थाची गोष्ट घडल्यापासून त्याचा पाया खचत चालला.

९. नानासाहेबास इंग्लिशांनी कोंकणांत आंग्र्यासीं युद्ध करण्यांत सहाय केलें होतें ह्मणून त्यांस पेशव्यापासून बाणकोट व आणखी नऊ गांवें इनाम दिलीं आणि कंपनी सरकाराशीं* तह केला.

१०. बाळाजी बाजीरावाच्या कारकिर्दीत प्रजेला कित्येक नवीं सुखें प्राप्त झालीं. मक्त्याच्या मामलतीची चाल मोडली व गांवकऱ्यानीं लुटाऱ्यांस मारावें असा रिवाज पडला. प्रांतांत जागोजागीं सुभेदार व मामलेदार यांच्या नेमणुका झाल्या व त्यांवर सरसुभेदार ठेविले. वसूल जमा

* इंग्लिश व्यापाऱ्यांची जी मंडळी आपल्या राजाची सनद घेऊन हिंदुस्थानांत व्यापार करीत होती तिला कंपनी ह्मणत. कंपनीस हिंदुस्थानांत राज्य मिळूं लागल्यावर तिला कंपनीसरकार असें नांव पडलें.

करणाराची पाहणी व्हावी असें ठरलें. पुण्यांत बाळकृष्ण गाडगीळ या नांवाचा एक कुलीन शास्त्री होता त्याला न्यायाधीश केला.

---

# प्रकरण ९.

## माधवराव, नारायणराव आणि रघुनाथराव.

## १७६१-१७७४.

माधवरावाचा विरोधी रघुनाथराव याच्याशीं त्याची स्तुत्य वर्त्तणूक—हैदराचा उदय—मराठी सैन्य पुनः दिल्लीस जातें — माधवरावाच्या अमलांत रयतेस काय सुख झालें— रामशास्त्री— मराठी राज्याचा वसूल—सैनेची संख्या—नानाफडणावेसाचा उदय—मराठी ग्रंथकार—नारायणराव— त्याचा मारेकऱ्याकडून वध— रघुनाथ राव पेशवा— पुण्यांतील दरबारांत एक बळकट पक्ष उत्पन्न होतो— सवाई माधवराव पेशवा होतो--रघुनाथ राव इंग्लिशांची कुमक मागतो—ते त्याला सहाय करितात— रघुनाथराव नेमणूक घेऊन उगाच बसतो— इंग्लिशास काय लाभ प्राप्त होतात— नानाचा व महादजी शिंद्याचा उत्कर्ष— माधवराव कसा मरतो— खरड्याची लढाई— देशाची स्थिति.

१. बाळाजी बाजीरावाच्या मागून त्याचा पुत्र माधव राव हा पेशवा झाला. त्यानें अकरा वर्षें अधिकार चालविला. त्याच्या बापाला जसे मराठी राज्यांत शत्रु होते तसे त्यालाही होते. त्याचा चुलता रघुनाथ राव, अथवा राघोबा दादा, व त्याची चुलती ( राघोबाची बायको ) आनंदी बाई, हीं उभयतां त्याला प्रतिकूळ होतीं. राघोबानें आपणास पेशवाई मिळावी ह्मणून कित्येक मराठे व मुसलमान सरदारांची कुमक घेतली. पण माधवराव फार विचारी व

दूरवर नजर देणारा होता. पेशव्याच्या घराण्यांत फूट होऊन परक्या शत्रूचा आंत प्रवेश होऊं नये म्हणून त्याने मोठ्या उदार मनाने रघुनाथरावाच्या हातीं सर्व कारभार दिला, व आपण नामधारी पेशवा होऊन राहिला. परंतु राघोबास युद्ध करण्याचें जसें सामर्थ्य होतें तसें राज्य चालविण्याचें चातुर्य नव्हतें. राघोबाचें तेज व वजन लोकांवर पडेना, सर्वांचे डोळे माधवरावाकडे लागले होते. राघोबास बंदांत टाकावें म्हणून माधवरावाची आई गोपिका बाई हिणें वारंवार त्याला सुचविलें, पण त्याने तिची मसलत ऐकिली नाहीं. त्याला आपल्या बरोबर कारभारांत वागवून तो त्याजसंगतीं कित्येक वेळां लढाईस गेला. एकदां राघोबास रणभूमीवर शत्रूनीं वेढिलें असतां त्याने मोठ्या शौर्याने आपल्या काकाचा प्राण वांचविला; तरी राघोबा संतुष्ट झाला नाहीं. तो आपल्या बायकोच्या तंत्राने वागे. ती त्याला सांगे कीं तुम्ही अर्धराज्य मागून घ्या. शेवटीं राघोबा इतक्या उद्धटपणाने वागूं लागला कीं, त्याला कैद करून पुण्यांतील वाड्यांत ठेवणें पेशव्यास भाग पडलें. (१७६८).

२. माधवराव पेशवा असतां हिंदुस्थानाच्या दक्षिणेस हैदर नावाच्या मनुष्याने म्हैसूरचें हिंदु राज्य मोडून आपलें राज्य स्थापिलें. तें मराठी राज्यास फार प्रतिकूल झालें-यामुळें तुंगभद्रेच्या पलीकडे मराठ्यांचें जाणें विशेष होई. नासे झालें. हैदराशीं मराठ्यांस वारंवार युद्ध प्रसंग येत. ह्या हैदराचा बाप प्रथम इतका गरीब होता कीं त्याला

पोट भरण्याची देखील भ्रांत पडत असे. आणि हैदर हा तर लाहानपणीं व्रात्य ( फार द्वाड, खोडकर,) पोर होता तो लिहावाचावयास तर कधींच शिकला नाहीं.

३. माधवरावानें हैदराशीं पुष्कळ लढाया करून त्याचा कांहीं मुलूख घेतला. त्यानें नागपूरच्या जानोजी भोसला (रघुजीचा पुत्र) यास आपला मित्र केला. पानपतच्या लढाईपासून आठ वर्षेंपर्यंत होळकराशिवाय दुसऱ्या कोण्या मराठ्याची फौज हिंदुस्थानांत गेली नव्हती, ती माधवरावानें पाठविली. त्या फौजेनें रजपूत व जाट यांपासून खंडण्या घेतल्या व बादशाहाच्या सेनेचाही एका जागीं पराभव केला. त्यावरून बादशाहानें इंग्लिशांचा आश्रय धरला होता तो सोडून पेशव्यास आपला मित्र केला. परंतु दिल्लींत माधवरावानें जे ब्राह्मण कारभारी ठेविले होते ते इतक्या अहोपी स्वभावाचे होते कीं बादशाहास इंग्लिशांचा आश्रय सोडल्याचा पश्चात्ताप झाला.

४. माधवरावाच्या राज्यांत रयतेस सुख मिळालें. तो स्वतां आपल्या कुटुंबांत व लोकांशीं सरळपणानें वागत असे. त्यानें आपलीं सर्व कामें निश्चयानें करावीं. गरीब रयतेवर सरकारी कामदारांनी जुलूम करूं नये व लांच खाऊं नये, म्हणून त्यानें आपल्या हातून होईल तितका बंदोबस्त केला. गांवकऱ्यांस सरकारची वेठ फुकट वाहावयास लावण्याची जी चाल होती ती त्यानें बंद केली. हा हुकूम वसईच्या सुभेदारानें मोडून आपलें सामान मजूर न देतांनें नवविलें असें जेव्हां माधवरावास समजलें तेव्हां त्यानें सर्व जप्त करून

ज्या लोकांस फुकट बिगार वहावयास लाविलें होतें त्यांस त्यांतून मजुरी दिली. कायदे करण्यांत त्याला मसलत देणारा रामशास्त्री नामक एक ब्राह्मण होता. प्रजेचें खरें हित पाहणारा, धन्याची विश्वासूपणानें सेवा करणारा, परद्रव्यास विषासमान मानणारा असे गुण ज्याच्या ठायीं एकत्र वास करीत होते असे मराठी राज्याच्या इतिहासांत जे फार थोडे पुरुष आढळतात त्यांपैकीं हा एक होता.

५. माधवरावाच्या मरणकाळीं ( १७७२ ) राज्याचा वसूल नांवास दाहा कोटि रुपये, पण खरोखर सात कोटि होता. माधवरावाचें स्वागत द्रव्य चोवीस लक्ष होतें तें त्यानें मरतां वेळीं सरकारास दिलें, कारण पेशवे सरकारावर फार कर्ज आलें होतें, आणि इंग्लिशांचा व पेशव्यांचा स्नेह होईपर्यंत तें ऋण मुक्त झाले नाहींत. मराठ्यांची जाथूची फौज पन्नास हजार निवडक स्वार होते, परंतु गायकवाड, भोसले, शिंदे वगैरे सर्व मिळून युद्धप्रसंगीं एक लक्ष घोडा समरांगणांत आणायास समर्थ होते.

६. मराठ्यांच्या दरबारांत नाना फडनवीस म्हणून जो राजकार्यकुशल पुरुष पुढें प्रख्यातीस आला, तो माधवरावापाशीं बाळाजी भानू या नांवानें कारकून होता. ह्या पेशव्याच्या अमलांत महाराष्ट्र देशांत महीपतिबावा कवि होता, त्यानें मराठींत पांच ग्रंथ ओवीबद्ध केले आहेत, त्यांचीं नांवें, भक्तविजय, भक्तलीलामृत, संतविजय, संतलीलामृत व कथासारामृत. दुसरा कवि रामजोशी हा माधवराव

शादीवर बसल्यावर एक वर्षाने जन्मला. त्याच्या बोधपर लावण्या लोकप्रसिद्ध आहेत.

## नारायणराव आणि रघुनाथराव.

७. माधवरावाच्या मागून त्याचा भाऊ नारायणराव पेशवा झाला. त्याने केवळ आठ महिने राज्य केलें. त्याला रघुनाथरावाने मारेकऱ्याकडून मारविलें. ह्या दुष्ट कृत्यास आनंदीबाई मूळ होती. रामशास्त्र्याने ह्या गोष्टीचा बारीक शोध लावल्यावर असें समजलें कीं, पेशव्याला धरावें असा राघोबाने लेखी हुकूम दिला होता, त्यावर धच्या ठिकाणीं शाई घालून कोणी मा केला होता. हें कृत्य आनंदीबाईशिवाय कोणाचें नसेल अशी सर्वांची खातरी झाली; तरी त्या गोष्टीस राघोबाचें अनुमोदन होतें. मग रामशास्त्र्याने रघुनाथरावाचा निर्भिडपणें निषेध करून तो सरकारचें काम सोडून पुण्यांतून निघून गेला.

८. ह्या नीच व घातकी उपायाने रघुनाथरावास जरी पेशवाई मिळाली, तरी त्याला प्रतिकूळ अशी एक बळकट फळी पुण्याच्या दरबारांत उत्पन्न झाली. त्यावेळेस कारभार चालविणार सखाराम बापू, त्रिंबकराव मामा, नाना फडनवीस, मोरोबा फडनवीस व बजाबा पुरंदरे, आनंदराव जिवाजी व हरिपंत फडके इतके होते ते शाहूने नेमलेल्या अष्टप्रधानांस एकीकडे बसवून स्वतां कारभार पाहूं लागले. ह्या पक्षकारानीं नारायण रावाची विधवा स्त्री गंगा बाई ही पतीच्या मरणकाळीं गरोदर होती तिला पुत्र

होईल अशी अपेक्षा धरली. इकडे रघुनाथराव आपली गादी संभाळण्याकरितां शुद्ध पक्षाच्या सैन्याशीं बरेच दिवस युद्ध करीत राहिला. परंतु त्याच्यापाशीं द्रव्याची कमताई असल्यामुळें, व त्याच्या दुष्कर्मांचा सर्वांस त्रास आल्यामुळें त्याचें लष्कर त्याला सोडून पुण्याच्या कारभारी मंडळीस मिळालें. इतक्यांत गंगाबाईस पुत्र झाला. तेव्हां कारभारी मंडळीने त्याचें नांव माधवराव असें ठेऊन मोठ्या समारंभानें त्याला चाळीसाव्या दिवशीं गादीवर बसविलें, व नाना फडनवीस हा राज्यकारभार पाहूं लागला.

९. माधवरावास मराठे लोक सवाईमाधवराव ह्मणतात. त्याला पुण्याची गादी मिळाली ह्मणून रघुनाथरावाने अणखी प्रयत्न करणें सोडलें नाहीं. त्या प्रसंगीं बंगाल आणि कर्नाटक ह्या प्रांतांत इंग्लिशांचें राज्य वाढत चाललें होतें; इंग्लिश हे पराक्रमी व राजकार्यधुरंधर लोक आहेत असें मराठ्यांसही समजूं लागलें होतें; त्यांचा एक वकील पुण्यांत राहत असे; इत्यादि कारणांवरून रघुनाथरावानें आपला उद्देश सिद्धीस नेण्याकरितां इंग्लिशांची कुमक मागितली; आणि इंग्लिशानीही आपणास कांहीं मुलूक मिळेल ह्या आशेने त्याचें कार्य करून देण्याचें मनावर घेतलें. आणि जेव्हां त्यांच्या सहायाने रघुनाथरावाने पुण्यांतील कारभारी मंडळीशीं युद्ध केलीं, तेव्हां सर्वांस वाटूं लागलें कीं, राघोबा जय पावेल. परंतु कलकत्याच्या गवरनर जनरल ह्याच्या हुकुमाखालीं मुंबई व मद्रास नव्यानेच आल्यावरून त्याने मुंबई सरकारची वर्त्तणूक नापसंत

करून. राघोबाला ह्या कामास मुळीं आश्रय देऊं नये असें इंग्लंडच्या गवरनरास लिहून आलें. नंतर गवरनर जनरल यांचा वकील पुण्यास येऊन असें ठरलें कीं इंग्लिशांनीं राघोबाचा पक्ष सोडावा, व राघोबानें आपल्या फौजेस फांटा देऊन पेशव्यापासून दरमहा २५,००० रुपये घेऊन मनास वाटेल तेथें जाऊन रहावें. त्याप्रमाणें तो रघुनाथराव कांहीं वर्षांनीं कोपरगांवीं जाऊन राहिला. तेथें तो १७८४ त मृत्यु पावला. याला बाजीराव व चिमणाजी असे दोन पुत्र होते.

१०. अशी एक म्हण आहे कीं, "दोघांचें भांडण आणि तिसऱ्याचा लाभ." ह्या म्हणीप्रमाणें पेशव्याच्या गादीसाठीं जें भांडण लागलें होतें त्यावरून बहुत तिऱ्हाइतांचें हित झालें. इंग्लिशांचें युद्धकौशल्य मराठ्यांच्या अनुभवास आलें, ह्यांच्या सैन्यावर त्यांची छाप बसली; आणि मराठ्यांस इंग्लिशांच्या स्नेहाचें महत्त्व दिसून आलें.

११. याच प्रसंगीं व याच कारणावरून महादजी शिंदा व नाना फडनवीस हे मोठ्या योग्यतेस चढले. शिंदा हा कांहीं दिवस राघोबाच्या पक्षाचा व कांहीं दिवस पेशव्याच्या पक्षाचा होता. म्हणून पेशव्यास त्याचें भय वाटून त्यानें त्याला राघोबाशीं व इंग्लिशांशीं तह वगैरे करण्याच्या कामांत सामील व पुढारी केला. तेणेंकरून तो उभय पक्षाच्या दृष्टींत योग्यतेस पावला. महादजीच्या मनांत नानास दूर करून त्याच्या जागीं आपण पेशव्याचा कारभार पहावा असें होतें, परंतु तो आपलें

महत्व वाढविण्याचे बेत करीत असतां पुण्यास जॉर्क वानवडी एथें मरण पावला. ( १७९४. ) त्यावेळीं तो हिंदुस्थानांत एक स्वतंत्र सत्ताधारी सरदार होता. त्याच्या राज्याचा मालक दवलतराव शिंदा झाला.

१२. परंतु ज्याच्या पेशवाईचे रक्षणार्थ मराठ्यांनीं एवढीं युद्धें व खटपट केली त्या बिचाऱ्या माधवरावास कांहींच लाभ झाला नाहीं. नाना फडणवीस हा आपल्या कुटिल युक्तींनीं दिवसानदिवस वाढत गेला. राज्याची सर्व सत्ता त्याच्या हातीं होती. माधवराव वयांत आल्यावर देखील त्याने त्याला कैदीप्रमाणें ठेविलें. रघुनाथरावाच्या कुटुंबासही त्याने प्रथम थोड्याशा अटकेंत ठेविलें होतें, परंतु बाजीरावाशीं माधवराव गुप्तपणीं स्नेह राखतो व त्याला भेटण्याची इच्छा बाळगतो असें त्याला समजल्यावर त्याने त्या कुटुंबास अधिकच बंदोबस्तांत ठेविलें, व माधवरावाची फार निर्भर्त्सना( विटंबना ) केली. तेणेंकरून माधवराव फार कष्टी व उदास होऊन एके दिवशीं त्याने माडीवरून खालीं कारंजावर उडी टाकली व तिसऱ्या दिवशीं मरण पावला. ( अकटो० १७९५. ) त्याचें वय २१ वर्षांचें होतें.

१३. मराठ्यांनी इंग्लिशांसीं ज्या लढाया केल्या त्यांखेरीज निजाम अलीशीं खरड्याजवळ मोठी लढाई केली. तींत निजामाचा मोठा पराजय होऊन त्याला मराठ्यांस पुष्कळ मुलूक सोडून देणें भाग पडलें. ( १७९५.)

१४. माधवरावाच्या पेशवाईंत देशास फारसें सुख

नव्हत. एक तर पुण्याच्या दरबारांत पुष्कळ कलह होऊन फुटी पडल्या होत्या, दुसरें त्यास हैदराशीं व त्याचा पुत्र टिपु सुलतान याच्याशीं नेहमीं युद्ध करावें लागत असे. हरिपंत फडके व परशुराम भाऊ हे त्यावेळचे नामांकित मराठी सरदार होते.

---

## प्रकरण १०.

### बाजीराव रघुनाथ.

### १७९६ — १८१८.

बाजीराव रघुनाथ पेशवा होतो — नाना कैदेंत पडतो— पुण्यांत लूट होते -- बाजीरावाचें शिंद्यासीं व नानासीं कपट -- नानाचें मरण व गुणवर्णन — घाशीराम कोतवाल — शिंदा व बाजीराव पुणें लुटतात --होळकराच्या घराण्यांत भांडण-- यशवंतराव पेशव्यासीं युद्ध करितो — पेशवा कोंकणांत पळून जातो — तो इंग्लिशांची मदत मागतो -- वसईचा तह -- घोडनदीवर गांव वसतो — इंग्लिशांच्या शिंदे होळकरांशीं लढाया — देशांत काहीं काळ स्वास्थ्य ---बाजीराव इंग्लिशांचा तह मोडतो — गंगाधर शास्त्री—त्रिंबकजी डेंगळ्या — पेंढारी — त्यांचा मोड — खडकीजवळ पेशवा इंग्लिशांसीं लढतो — बाजीरावाचा क्रूर स्वभाव -- बाजीराव पळत सुटतो — इंग्लिशांस शरण येतो—पेशव्याच्या राज्याची समाप्ति---बाजीराव पळतांना जीं युद्धें झालीं तीं—कोरेगांवची लढाई क्यापटन स्तानटन-लेफटनेंट पाटिनसन — बापू गोखला—बाजीराव पदलण्याचें कारण-भनरावल एलफिन्स्तन साहेब राज्याची व्यवस्था करतात.

१. रघुनाथरावास जरी पेशव्याची गादी बसायास मिळाली नाहीं तरी ती त्याचा पुत्र बाजीराव यास त्याच्या मरणानंतर प्राप्त झाली त्यालाही बरेच प्रयास पडले.

नाना फडनवीस हा त्याचा मुख्य विरोधी होता. परंतु बाजीरावास शिंदा अनुकूळ असल्यामुळें नानास आपला उद्देश सोडून द्यावा लागला. माधवरावाच्या मरणानंतर एका वर्षानें बाजीराव पेशवा झाला.

२. बाजीरावाचा दिवाण नाना होता, परंतु त्याच्या तंत्रानें चालायाचें त्याला सहन होईना, ह्मणून त्यानें शिंद्यांच्या सहायानें त्याला धरून कैदेंत ठेविलें. त्या प्रसंगीं बाजीरावाचा एक परम विश्वासू सर्जेराव घाडगा नांवें मनुष्य होता त्याच्या हुकुमावरून पुण्यांत नानाचें घर लुटण्याच्या निमित्तानें मोठी गर्दी झाली, व कित्येक ठिकाणीं तोडातोडी चालली. शहरचे लोक आपले दरवाजे बंद करून लुटारूंवर बार करीत. कोणास बाहेर पडायाचें असलें तर पांच पंचवीस जणांची हत्यारबंद टोळी जमून जात असत. याप्रमाणें ४८ तास पुण्यांत धुमाळी चालली होती.

३. बाजीरावानें शिंद्याशीं जें सख्यत्व केलें होतें तें मनापासून नव्हतें; नानास बंदांत टाकल्यावर शिंद्यास कैद करण्याचा त्यानें मनसोबा केला, पण त्याच्याच भित्रेपणामुळें तो सिद्धीस गेला नाहीं. शिंद्याचें व पेशव्याचें वांकडें पडल्यावर शिंद्यानें पेशव्यास भीति घालण्यासाठीं नानापासून दाहा लक्ष रुपये घेऊन त्याला मुक्त केलें. परंतु नानास पेशव्याचा विश्वास येईना ह्मणून त्याला कामावर बोलावीत असतांही तो आपलें शरीर व द्रव्य यांच्या रक्षणाविषयीं

निजाम व इंग्लिश यांची जामीनकी मागूं लागला पण बाजीराव मोठा मायावी व पोटांत शिरून काळीज खाणारा होता. त्यानें नानास एकांतीं गांठून त्याच्या पायावर डोयी ठेवून व डोळ्यांत पाणी आणून व आपली वाचाशक्ति खर्चून नानास असें मोहिलें कीं पूर्वीं जें झालें त्यांत ह्याचा कांहीं हात नव्हता, व अतःपर हा आपणासीं कधीं पडदा ठेवून वागायाचा नाहीं, असी त्याची खातरी झाली; आणि त्यानें लागलीच त्याची दिवाणगिरी पत्करली. इतकें झाल्यावरही बाजीराव त्याला पुनः अटकेंत टाकायास पाहत होता, पण नाना पुढें बहुत दिवस वांचला नाहीं. बाजीराव गादीवर बसल्यानंतर तीन वर्षांनीं तो मरण पावला. (१८००.)

४. नाना फडनवीस राजनीतींत परम दक्ष होता. त्याच्या अमलांत देश आबादान होता. त्याच्या बराबर मराठी लोकांचें राज्य चालविण्याचें शहाणपण व विनय हीं दोन्हीं गेलीं. त्याच्या मनांत कांहींसा स्वदेशाभिमान होता. ब्राह्मणांचें राज्य चालावें असी त्याची मोठी इच्छा होती. परक्यांचा हात आपल्या कारभारांत नसावा ह्मणून तो फार जपत असे. इंग्लिश लोक मराठ्यांचें राज्य काबीज करतील असें त्याच्या अटकळींत आलें होतें. तो त्यांचें बळ व चातुर्य जाणून होता. तो लढाईच्या कामांत फार भित्रा असे. प्रजेची वहिवाट व वसूल घेणें हीं कामें माधवरावाच्या रीतीप्रमाणें चालविण्याची त्याची इच्छा होती. पण मोठमोठ्या कामांमुळें त्याला मुलकाची पाहणी करायास अव-

काश सांपडला नाहीं. त्याच्या बंदोबस्ताची इतकी मंदी पडली होती कीं, पुण्यांत घाशीराम कोतवालाने लोकांवर अतिशय जुलूम चालविल्यावरून त्यानीं त्याला घरांतून बाहेर काढून धोंडमार करून जिवें मारलें; इतकें होई पर्यंत सरकारचें लक्ष्य त्याकडे पोंचलें नाहीं.

५. बाजीरावास गादीवर बसविण्यास शिंद्यानें जें सहाय केलें त्याबदल त्याने त्याला दोन कोटि रुपये कबूल केले होते. ते जेव्हां शिंदा मागूं लागला तेव्हां आपल्यापाशीं इतकें द्रव्य देण्यास सामर्थ्य नाहीं ह्मणून बाजीरावाने शिंद्याच्या मसलतीने पुण्यांतील श्रीमंत शेटसावकारांस अनेक प्रकारें गांजून त्यांपासून द्रव्य काढलें. त्यांत एका मनुष्याला तर तापलेल्या तोफेवर बांधलें, तो तसाच मेला.

६. मल्हारराव होळकर मेल्यावर त्याच्या राज्यास त्याचे चौघे पुत्र वारस सांगूं लागले. त्या बखेड्याचा निवाडा करणें त्यानीं शिंदा व बाजीराव यांजकडे सोंपलें. तेव्हां शिंद्याने त्यांतून दोघा भावांस जिवें मारिलें व एकास आपल्याजवळ ठेवून घेतला. असा परिणाम पाहून बाकी जिवंत व मोकळा राहिलेला भाऊ यशवंतराव होळकर यानें सुमारें पन्नास हजार फौज मिळवून पुण्याजवळ शिंदा व पेशवा याच्या एकत्र झालेल्या फौजेचा अगदी मोड केला. त्या कारणानें बाजीरावास तर पुणें सोडून कोंकणांत पळून जावें लागलें. ( १८०२.) पुढें त्याला आपली गादी मिळवायास इंग्लिशांची मदत घ्यावी लागली.

त्याकरितां त्यानें त्यांशीं वसई मुक्कामीं तह केला. त्यांत मुख्य अर्थ हा होता कीं इंग्लिशांनीं बाजीरावास पुनः गादीवर बसवावा, व बाजीरावानें आपल्या मुलकांत इंग्लिशांचीं साहा पलटणें चाकरीस ठेवावीं, व त्यांच्या खर्चाबदल पंचवीस लक्षांचा मुलूक त्यांस तोडून द्यावा, आणि इंग्लिशांच्या सल्ल्याशिवाय कोणाशीं युद्ध किंवा तह करूं नये व युरोपांतील गोरे लोक आपल्या चाकरीस ठेवूं नयेत. ह्या तहाच्या मितीपासून ( ३१ दिसेंबर १८०२ ) मराठी राज्याचें स्वातंत्र्य बुडालें. बाजीरावास गादीवर बसविण्याच्या पूर्वींच होळकर आपल्या राज्याच्या बंदोबस्ताकरितां महाराष्ट्र देशांतून निघून गेला होता. त्यानें जाण्याच्या अगोदर पुणें शहर लुटलें व लोकांस बहुत प्रकारचीं दुःखें देऊन त्यांपासून द्रव्य काढून घेतलें.

७. बाजीरावानें इंग्लिशांची जी फौज चाकरीस ठेविली तिचा तळ घोडनदीवर पडला, त्यामुळें तेथें मोठा गांव वसला, तो १८१८ मध्यें तेथची छावणी उठेपर्यंत गजबजीत होता.

८. वसईचा तह भोसले व शिंदे यांच्या मनास आला नाहीं; आणि ते आपल्या फौजा दक्षिणेंतून परत नेईनात ह्मणून इंग्लिशांस त्यांशीं युद्ध करावें लागलें, तें सात महिने चाललें; त्यांत जनरल लेक व वेलस्ली हे सरदार मोठा पराक्रम करून विख्यात झाले. ह्या लढायांत इंग्लिशांस मोठमोठे लाभ झाले; त्यांस पुष्कळ मुलूक मिळाला, पेशवा, निजाम, गायकवाड वगैरेकडे ठेवलेल्या चोवीस हजार

फौजेचा खर्च बाहेर पडून तीच फौज कारणप्रसंगीं त्यांस उपयोगी पडेल असी झाली; आणि होळकर, शिंदे व भोसले यांसीं तह ठरले त्यांत पुष्कळ कलमें इंग्लिशांच्या हिताचीं होतीं.

९. यानंतर महाराष्ट्र देशांत सुमारें १४ वर्षें स्वस्थता होती. बाजीरावाने पटवर्धन वगैरे दाक्षिणेंतील सरदार, जहागीर, इनामदार हे मोडण्याचा उद्योग आरंभिला होता, पण इंग्लिशानी त्याचा बेत सिद्धीस जाऊं दिला नाहीं.

१०. बाजीरावाने संकटसमयीं इंग्लिशांसीं तह केला होता खरा, पण आंतून तो त्यांचा द्वेष करी, आणि त्यांशीं उघड वैर करण्यास तो अनुकूळ संधि पाहत होता. त्याने लहानसान जाहगिरी मोडून आपल्या खजिन्यांत पांच कोटि रुपये जमविले. आणि गायकवाडाचा वकील गंगाधर शास्त्री पटवर्धन हा इंग्लिशांचें अभय वचन घेऊन, आपल्या धन्याच्या कार्यार्थ पुण्यास आला होता. त्यास त्याने पंढरपुरीं मारविलें. हेच दुष्कर्म बाजीरावाचें राज्य जाण्यास शेवटलें कारण झालें. गंगाधर शास्त्र्यास मारणारा त्रिंबकजी डेंगळा हा हलक्या प्रतीचा मनुष्य असून बाजीरावाने त्याला आपल्याजवळ बाळगून वाढविला होता. त्याला आपल्या स्वाधीन करावें असा मुंबई सरकाराने आग्रह केल्यावरून पेशव्यास तो त्यांच्या हातीं देणें प्राप्त झालें. त्याला इंग्लिशानी काशीजवळच्या एका क़िल्ल्यावर जन्मठेप देऊन ठेविला. नंतर बाजीरावाच्या

व इंग्लिशांचा नवा तह झाला त्यांत पूर्वीपेक्षां पेशव्याचें महत्व व सत्ता कमी झाली.

११. ह्या प्रसंगीं इंग्लिशानीं हिंदुस्थानांत पेंढाऱ्यांचा नाश करण्याचें लोकहिताचें एक महत्कार्य आरंभिलें होतें. पेंढारी हे लुटारू होते. त्यांत अनेक जातीचे लोक येऊन मिळत. ते घोड्यावर बसून प्रांतोप्रांतीं स्वाऱ्या करीत. गांवांत लोकांचे अनेक प्रकारें हाल करीत; लोखंड तापवून डाग देत; दगड डोक्यावर ठेवीत; घरें दारें जाळीत; अंगास फडकीं बांधून आग लावून देत; आणि जितकी लूट मिळेल तितकी घेऊन जात. ते क्रूर व घातकी मात्र होते; त्यांच्या अंगीं शूरपणा नव्हता. अशा लुटारूंच्या टोळ्या सर्व हिंदुस्थानांत पसरल्या होत्या व त्यानीं प्रजेस फार उपद्रव देण्याचें चालविलें होतें.* अशा दुरावस्थेंत दुःख मानण्याची आणखी एक गोष्ट अशी होती कीं पेंढाऱ्यांस संस्थानिक लोकांची आंतून मदत व फूस मिळत असे, त्यामुळें ते फार धिट झाले होते. जेव्हां त्यानीं इंग्लिशांच्या प्रजेवर क्रूरता करण्याचें आरंभिलें तेव्हां त्यांच्या उपद्रवापासून सारा देश मुक्त करावा असा कलकत्त्याचे गवर्नर जनरल मार्किस आफ् हेस्तिंगस यानीं निश्चय केला. या कामाकरितां फार मोठ्या फौजेची योजना चहूंकडून केली.† त्या सैन्याच्या मदतीस मुंबई सरकाराने आपली

* हिंदुस्थानांतील इंग्लिश राज्याचा इतिहास. पृष्ठ १५८.

† राज्याकरितां किंवा शत्रूच्या पारिपत्याकरितां युद्धें करण्याची

दक्षिणेंतील घोडनदीवरची फौज रवाना केली. ही संधि पाहून बाजीरावानें आपल्या उपकारकर्त्यांशीं उघड बिघाड पाडला.

१२. सन १८१७ च्या नोवेंबर महिन्याच्या ५ व्या तारखेस बाजीरावाच्या सैन्यानें पुण्यानजीक खडकी एथील इंग्लिशांच्या लष्करावर हल्ला केला. हें लष्कर जरि फार थोडें होतें तरि त्यानें बाजीरावाचा हल्ला पडण्याच्या पूर्वींच त्यावर चाल करून त्याला मागें हटविलें इतकेंच नाहीं तर त्याचा मोडही केला. ही लढाई संध्याकाळपर्यंत झाली. तींत पेशव्याचे सुमारें ५०० लोक पडले व इंग्लिशांचे १८ मेले व ५७ जखमी झाले. मराठ्यांचें लष्कर २५००० होतें व इंग्लिशांचे १८०० लोक होते. ह्या लढाईचा परिणाम काय होईल तो बाजीराव पर्वतीच्या उंच टेंकडीवरून पाहत होता. दुसऱ्या दिवसीं इंग्लिशांच्या लष्करास घोडनदीवर राहिलेल्या लोकांची कुमक आली आणि पेंढाऱ्यांवर जी फौज जनरल स्मिथ साहेबाबरोबर गेली होती ती सात दिवसांत खडकीच्या सेनाभागास येऊन मिळाली. मग त्याच महिन्याच्या १६ व्या तारखेस खडकीचें लष्कर

---

चाल सर्वत्र आहे आणि हिंदुस्थानांतील राजानीं आपण स्वतां फौजेच्या हातून प्रजा लुटल्या व लुटारू बाळगिले; परंतु लुटारू आणि हत्या करणारे ह्यांपासून प्रजेस सोडविण्याकरितां इतकें द्रव्य खर्चून श्रमानें युद्ध केल्याचें उदाहरण हें पहिलेंच आहे.- हि० इं०रा० इ० पृ. १८३

नदी उतरून पुण्यास गारपिरावर उतरलें, व दुसऱ्या दिवशीं हल्ला करण्याची तयारी करून राहिलें, तों त्याच रात्रीं बाजीराव लष्करासुद्धां साताऱ्याकडे पळाला. नंतर १७ व्या तारखेस इंग्लिशांनी पुणें हस्तगत केलें.

१३. ह्या लढाईस आरंभ झाला न झाला इतक्यांत बाजीरावानें आपला क्रूर व अकसी स्वभाव प्रकट केला. गारपिरावर जें इंग्लिशाच्या वकिलाचें राहण्याचें घर व पुस्तकगृह होतें तें लुटलें व जाळलें. त्याच्या बाजारबुणग्यांतल्या बायका व मुलें यांस धरून लुटलें, मारझोड केली व कित्येकांचे हात पाय, नाक कान कापले. बागबगीच्यांचा विध्वंस केला, झाडें मुळासुद्धां उपटलीं, कबरा खणून त्यांतील हाडें बाहेर फेकलीं.

१४. बाजीराव सात महिने एकसारखा पळत होता. तो जिकडे जाई तिकडे त्याच्या पाठीवर जनरल स्मिथ साहेब होताच. दक्षिणेकडे जनरल मनरो व प्रिट्स्लर साहेबांचीं लष्करें होतीं; पूर्वेस नागपुराचे बाजूस जनरल डफटन व हिस्लाप यांचीं लष्करें होतीं; उत्तरेस सर जान मालकम ह्यांचें सैन्य होतें. अशा चतुःसीमांनीं त्याच्या भोंवता गराडा असतां तो दोनदां कृष्णा उतरून गेला, दोनदां पुण्याजवळ आला. नंतर सोलापूर गोदावरीच्या उत्तर प्रदेश, वऱ्हाड, इत्यादि देशांत भ्रमण करीत राहिला. शेवटीं सातपुड्याच्या वाटेनें हिंदुस्थानांत जात असतां त्या घाटाजवळ इंदुरास सर जान मालकम

यांचें लष्कर येऊन पोंचलें. त्या वेळीं पळून उपयोग नाहीं, असें जाणून बाजीराव त्या सरदारास शरण आला. नंतर पेशवा ह्याने आपल्या तर्फेने राज्याचा सर्व दावा सोडावा आणि दरसाल आठ लक्ष रुपये नेमणूक घेऊन गंगेच्या कांठीं ब्रह्मवर्त्त एथें राहावें असा करार करून देऊन तो इंग्लिशांच्या स्वाधीन झाला.

१८१९. बाजीराव पळत असतां त्याचीं व इंग्लिशांचीं कितीएक युद्धें झालीं; त्यांतील एका युद्धांत इंग्लिशांचे तीनशें स्वार व पांचशें पायदळ व दोन तोफा इतकी लहानशी टोळी कपतान स्तांटन साहेब घोडनदीहून पुण्यास येत असतां कोरेगांव एथें त्यास बाजीरावाच्या पंचवीस हजार लष्कराचा मारा सकाळच्या दाहा घटिका दिवसापासून प्रहर रात्रपर्यंत सोसून अन्न नाहीं, पाणी नाहीं अशा स्थितींत शत्रूंचा इलाज आपणावर चालूं दिल्हा नाहीं. ह्या आश्चर्यकारक लढाईंत इंग्लिशांचे लोक सुमारें पन्नास साठ मेले व एकशें पांच मात्र जखमी झाले. मराठ्यांचे पांच साहाशें मेले व जायां झाले. दुसऱ्या दिवशीं जनरल स्मिथ साहेब बाजीरावाच्या पाठीवर आला असें ऐकून मराठ्यानीं तेथून पळ काढला. ह्या लढाईंत लेफ्टनेंट पाटीनसन नामें तोफखान्यावरील एक सरदार होता. त्याच्या पाठींतून गोळी जाऊन तो जखमी होऊन पडला असतां त्यानें ऐकिलें कीं त्याची एक तोफ पेशव्याच्या आरबानी घेतली. तेव्हां तो लागलाच उठून त्या आरबांत शिरून आपल्या बंदुकीच्या दस्त्याने त्यांतून कित्येकांस

मारून त्याने ती तोफ परत आणली. हें महाशौर्याचें काम करीत असतां त्याच्या शरीरांतून दुसरी एक गोळी पार गेली तेव्हां मात्र तो अगदीं गळून पडला. तरी तो तिसऱ्या दिवशीं घोडनदीस पोहंचल्यावर मेला. हा महावीर मोठा बळकट पुरुष होता. त्याची उंची ६ फूट, ७ इंच होती. त्याचें शौर्य पाहून त्याच्या हाताखालच्या काळ्या शिपायांनीहि मोठ्या धैर्यानें त्याचें सहाय केलें. दुसरी लढाई पंढरपुराजवळ झाली. तींत पेशव्याचा शूर सरदार बापू गोखला हा मोठा पुरुषार्थ करून हातांत तरवार असतां पडला. त्या लढाईंत बाजीरावाने आपल्याबरोबर पळायास घेतलेला साताराचा राजा इंग्लिशांच्या हातीं लागला. तिसरी लढाई सातपुड्यामध्यें झाली. त्या वेळीं इंग्लिशांचे लोक पाहतांच बाजीराव घोड्यावर बसून पळून गेला; आणि त्याच्या लोकांची फार दुर्दशा झाली. त्याचे एक हजार लोक मेले व इंग्लिशांचे दोन तीन जखमी मात्र झाले.— कोरेगांवच्या लढाईची आठवण राहावी ह्मणून सरकाराने तेथें एक जयस्तंभ उभा केला आहे.

१६. बाजीरावास इंग्लिश सरकारासीं कपटाने वागण्यास शत्रुत्व करायास कांहीं कारण नव्हतें. वसईच्या तहाकडून त्याला त्याचें राज्य प्राप्त झालें इतकेंच नाहीं, तर तो आपल्या स्वदेशीय शत्रूंच्या हातांतूनही सुटून निर्भय झाला होता. त्याच्या देशांत बंडें व धुमाळी होण्याचें बंद झालें रयतेस सुख झालें, जमिनीचा वसूल वाढण्याचीं चिन्हें

दिसूं लागलीं. त्याची सत्ता जी पूर्वी पुण्याच्या बाहेर क्वचित् चालत होती ती सर्व राज्यावर चालूं लागली, परंतु ह्या लाभांकडे त्याने लक्ष्य दिलें नाहीं. आपली सत्ता व महत्त्व वाढवावें हीच त्याची मुख्य इच्छा होती. आणि ती पूर्ण करण्यासाठीं त्याने सर्व प्रकारचे अयोग्य व दुष्ट उपाय चालविले. तो आपल्या उपकार करणाऱ्यांवर फिरला, त्याने त्यांशीं कपट केलें. बाहेरून तो त्यांशीं गोडगोड बोलत असतां आंतून त्यांच्या नाशाच्या मसलती करूं लागला. त्यांच्या लष्करास फितवायाचा त्याने यत्न केला. आणि शेवटीं ज्याच्या अभय वचनाने परराज्याचा वकील त्याच्या दरबारीं आला होता त्याला विश्वासघाताने मारलें. याप्रमाणें कापट्य, कृतघ्नता व क्रूरता हीं स्वार्थ साधण्याच्या कामास त्याने योजिलीं, आणि तेणेंकरून जें त्यापासीं होतें त्यासही तो मुकला. ईश्वरी शास्त्रांत सांगितलें आहे कीं, जो कारभारी थोडक्या गोष्टींत विश्वासूपणाने वागत नाहीं त्याचें जें कांहीं आहे तेंहि त्यापासून घेतलें जाईल. महाराष्ट्र देशांतील सर्व राजांची व त्यांत विशेषेंकरून बाजीरावाची खबर हीच ह्या शास्त्रवचनावर उत्तम टीका आहे. यावरून आह्मी समजावें कीं ईश्वर न्यायी आहे व तो सर्व अन्यायकर्म करणारे मग ते राजे असोत किंवा प्रजा असोत, त्यांस शासन करितो.

१७. बाजीरावाचें राज्य गेल्यावर महाराष्ट्र देशाची व्यवस्था करण्यास हिंदुस्थानच्या मुख्य सरकाराने अनरावल एलफिनस्तन साहेब यांस कमिशनर नेमलें. त्यांनी

ह्या नव्या राज्याचा अशा प्रकारें बंदोबस्त केला कीं सर्व प्रजा संतोषानें इंग्लिशांच्या अधिकारास मान्य झाली.

---

## उपसंहार.

१. याप्रमाणें आपण आपल्या देशाचा सुमारें एक हजार वर्षांचा इतिहास संक्षेपाने पाहिला. यांत सर्व मोठ्या अगत्याच्या गोष्टी आल्या आहेत. त्या सर्वांकडे लक्ष्य लावून मनन केलें असतां असें दिसतें कीं या देशांत मोठ्या उलटापालटी झाल्या. सिथियन, आर्य, बौद्ध, हिंदु, मुसलमान, मराठे, पोर्टुगीस ह्या सर्वांनीं एथें राज्यें केलीं. त्यांतून कित्येकांच्या वैभवाचीं व चातुर्याचीं स्मारक चिन्हें अद्याप दृष्टीस पडतात. त्यांत मोठमोठे योद्धे, शूर, कारस्थानी असे पुरुषही झाले. त्यांनीं आपल्या बुद्धीच्या बळाने राज्यें स्थापिलीं, राष्ट्रें जिंकिलीं, अमल चालविला, व आपलें नांव गाजविलें; पण प्रजेच्या हिताकडे ह्मटलें तर थोड्यानीच लक्ष्य पोंचाविलें. आर्यांनीं मूळच्या महार, भिल्ल इत्यादिकांस गांजलें व नीच दशेंत ठेविलें. त्यांच्या मागून जे बौद्ध आले त्यानी हिंदूंस पिडलें. बौद्ध राजांची समाप्ति झाल्यावर हिंदूंनी पुनः त्यांस छळलें, आणि त्या सर्वांस मुसलमानांनीं पायाखालीं तुडविलें. याप्रमाणें जिच्यासाठीं राज्य ह्मणून करायाचें व जिच्या मुळेंच राज्य उत्पन्न होतें अशी जी प्रजा ती सर्वदा सर्वांची दासी होती. देशांत दंगे, बंडें, लूट, जाचणूक, अन्याय, जुलूम

हेच राज्य करीत होते असें ह्मटल्यास काहीं बाध येणार नाहीं?

२. जे राजे व अधिकारी इतर देशांत झाले त्यांनी तरी बहुत दिवस एकसारखें राज्य केलें, व आपली प्रजा सुखी ठेवली असेंही या देशांत झालें नाहीं. त्यांच्यांत एकी नव्हती. जात व धर्म यांच्या भेदामुळें त्यांनी एकमेकांचा द्वेष केला व दुसऱ्यांचा नाश करण्यास उद्युक्त होऊन आपला-ही नाश करून घेतला. परचक्र आलें असतां त्यांनी एकमेकांचें सहाय करून तें निवारलें नाहीं. जो बळि-ष्ठ दिसला त्याचा पक्ष धरला, व निर्बळास पायाखालीं रगडलें. त्यांच्या सैन्यांत कवाईत व कायदे नव्हते. त्यांचे सरदार जरी शूर असत तरी ते पडले ह्मणजे सेनेचें धैर्य खचून ती उधळून जाई. ज्या राजांचा धर्म एक हो-ता त्यांनी तरी परस्परांचा बचाव केला असें नाहीं. कारण त्यांच्या धर्मांत प्रीतीचे व शांतीचे गुण नव्हते.

३. ह्या व दुसऱ्या बहुत कारणांवरून ह्या देशांत एक राजा कधीं झाला नाहीं, व प्रजेस सतत व दीर्घ काळपर्यंत सुख मिळालें नाहीं. आणि जेव्हां मिळे तेव्हां तें पर्जन्य काळच्या उनाप्रमाणें क्षणिक व चंचळ असे. आजचें पागोटें उद्यां आपल्या डोकीवर राहील कीं नाहीं याचा कोणास भरवसा नव्हता; असा प्रकार कोठवर चालला असता हें सांगवत नाहीं, परंतु मागल्या हजारों वर्षांच्या इतिहासावरून असें अनुमान होतें कीं पुढेंही

हजारों वर्षें असीच उलटापालट, रणधुमाळी, लुटालूट व प्रजापीडन हीं चाललीं असतीं.

४. तर ईश्वरानेच दया करून हा देश अशा दुरावस्थेंतून काढला. परमेश्वर न्यायी व दयाळू देव आहे. इंग्लिशांचें राज्य या देशांत कोणत्या प्रकारें वाढलें या (नि)ष्पक्षपाताने विचार केला असतां असें दिसून येईल कीं ह्या देशाच्या कल्याणार्थ ईश्वराने त्यांस एथें आणिलें. त्यांच्या येण्यापासून देशाला किती सुख व समाधान झालें आहे याचा थोडासा विचार करण्यास या लहानशा ग्रंथाच्या दुपटीचाही ग्रंथ पुरणार नाहीं, तरी एक दोन गोष्टी सांगितल्या पाहिजेत. इंग्लिशांच्या राज्यापासून पहिला लाभ हाच आहे कीं प्रजेच्या मालमत्तेचें व जिवाचें चांगलें रक्षण होतें. पूर्वींच्या सरकारांत ह्या दोनी गोष्टी फार उण्या होत्या. लोकांचीं जुनीं गांवें व जुनीं घरें पाहा. किल्ल्याच्या तटासारख्या उंच त्यांच्या भोंवतीं मोठाल्या भिंती दृष्टीस पडतात. कारण त्यांस पेंढारी व दुसरे लुटारू व दरोडखोर व कधीं कधीं त्यांचेच सरकारचें लष्कर यांचें फार भय असें; पण आतां गांवकुसें पडत चाललीं आहेत व कोणी घराभोंवतां उंच भिंती घालीत नाहींत. दुसरा लाभ या राज्यांत हा आहे कीं, सर्व न्याय इनसाफ कायद्याने होतो. मनुष्याचा जिव जनावराच्या जिवासारखा लेखला जात नाहीं, व गरिबाची धडोती चोराने चोरली किंवा दायादानें दडपली तरी तिची चौकशी श्रीमंताच्या शाल

जोडीप्रमाणेंच होते. पूर्वी सर्व याच्या उलट होतें. जनावराकरितां माणसाचा जीव जात असे. खून झाला तर त्याबद्दल दंड घेऊन अपराध्यास सोडून देत; आणि बहुधा खुनी मुकद्दमा सरकारापुढें येतच नसे, आंतल्या आंत दावादावी करून टाकीत. व कोणी कोणास नाडून त्याचें घर धुळीस मिळविलें तरी सरकारांत दाद लागत नसे. तिसरा लाभ हा झाला आहे कीं, व्यापार वाढला. त्याला एक कारण सडका त्या पूर्वी नव्हत्या, दुसरें कारण देशांत स्वास्थ्य. चौथा लाभ विद्येची वृद्धि. पूर्वीचें अज्ञान ह्मणजे इतकें होतें कीं ब्राह्मणाशिवाय, व कांहीं शेणवी, परभू यांखेरीज दुसऱ्या जातींत नुस्ता वाचणारा व लिहिणारा मिळणें कठीण. पांचवा लाभ कुळंबी लोकांवर जो जुलूम होत असे, व त्यांस सरकारच्या अगणीत पट्ट्या व कर द्यावे लागत ते सर्व माफ झाले. सहावा लाभ सर्वांस आपापल्या धर्माप्रमाणें व मनास वाटेल तो धर्म स्वीकारून वागण्याची मोकळीक झाली आहे. पूर्वी सोनारांस ब्राह्मणासारखें धोतर नेसण्याची देखील मोकळीक नव्हती. याप्रमाणें कांहीं लाभ एथें दाखविले आहेत.

५. हें सरकार इतकें चांगलें, न्यायी, व दयाळू असण्याचें कारण काय? याचें मुख्य कारण हेंच आहे कीं ज्या धर्माप्रमाणें तें चालतें तो खरा व प्रीतीचा धर्म आहे. आणि जों जों ह्या सरकारचे सर्व कायदे त्या धर्मास अनुसरून होतील तों तों त्याच्या हातून प्रजेस अधिक सुख मिळत

जाईल. ह्या देशांत पूर्वीपासून चालत आलेला
धर्म लोकांस न आवडल्यामुळें व त्यापासून त्यांचें गो
व शांति न झाल्यामुळें त्यांनीं वारंवार ब्राह्मणांच्या बंधनांतून मुक्त होण्यास यत्न केले. तुकाराम वगैरे जी वैष्ण
साधु मंडळी झाली त्यांचा हाच हेतु होता कीं सर्व धर्म
मार्ग टाकून भक्तिमार्गानें ईश्वरास भजावें; ब्राह्मणांचें म
मोडावें व देवाला स्वतां विश्वासानें संतोषवावें. त्यांनीं
धर्मांतर केलें तें लहानसान नव्हतें परंतु ते केव
ईश्वराच्या सहायावांचून आपला उद्योग चालवीत हो
म्हणून चुकले. ते वेदांतमतांत शिरले व त्यांच्या हा
लोकांचें कल्याण झालें नाहीं.

६. इंग्लिश सरकारचा जो धर्म म्हणजे ख्रिस्ती धर्म तें
या देशांत आला आहे, त्याचे उपदेशक एथें काम करीत
आहेत. त्यांस गांवोगांवीं व रस्तोरस्तां उपदेश करण्यास मुनीं
विलायतेंतील बादशाही पार्लमेंटापासून मोकळीक त्यांच्या
आहे इतकेंच नाहीं, तर राजांचा राजा व प्रभू कारण
जो देवाचा पुत्र येशू ख्रीस्त त्यापासून आज्ञा व अधिकार धीं
मिळाला आहे. ह्या धर्मांत विश्वासानें मनुष्य तरतो आतां
विश्वासानें ईश्वर संतुष्ट होतो, असा सिद्धांत आहे. उंच
तो खरा आहे असें बहुत प्रमाणांवरून पटलें आहे. आहे
धर्माला मनुष्याचा आश्रय नाहीं, राजाचा आश्रय या
देवाचा आश्रय आहे. परंतु हिंदु, मुसलमान हे व
राजांच्या आश्रयानें वाढले व टिकले, आणि आतां तो
नाहींसा झाल्यावरून ते पडायाच्या लागास आहेत.

करून पडतीलच यांत संशय नाहीं. त्यांस त्यांच्या
ीय लोकांकडून जबर धक्के बसत चालले आहेत.
श विद्येने जे सुधारले आहेत त्यांचा विश्वास त्यावरून
त चालला आहे. पूर्वी लढाया व दंगे यांच्यामुळें लोकांस
र्माचा शोध करायास फारसा वेळ नव्हता. वाडवडिलां-
कडे पाहून जो तो आपल्या धर्मास मानी, पण आतां लोकां
स काळ अवकाश सांपडतो व त्याचे विचार जागृत करणारे
सरे लोक बाहेरून आले आहेत. परंतु त्यांच्या जागीं
थले लोक कोणता धर्म स्वीकारतील ? ते नास्तिक तर
होणार नाहींत, तर खोटा धर्म सोडून नास्तिक होण्यापेक्षां
यानी खऱ्या धर्माचा स्वीकार करावा. खरा धर्म ख्रिस्ती
धर्माशिवाय दुसरा नाहीं. त्याचीं प्रमाणें त्यानी पाहून त्या-
वे ना अंगिकार करावा. ह्मणजे जसे इंग्लिश लोक त्याच्या
व गाने इतकें ज्ञान, विद्या, वैभव, नीति, भक्ति व सुख
कुळ ले तसें तेही पावतील. ख्रिस्ती धर्माचें सार ह्या
च्या ... वाक्यांत आहे.

ह्या "देवाची तारक कृपा सर्व माणसांस प्रसिद्ध झाली
टल ते. ती आह्मास असें शिकविते कीं, आह्मी अभक्तीला, व
पूर्वी तल्या इच्छांस नाकारून या सांप्रतकाळीं सुबुद्धीने व
मोकळे ने व सुभक्तीने वागावें. आणि धन्य अशा प्राप्तीची,
आहेत, मोठा देव व आमचा तारणारा येशू ख्रीस्त त्याच्या
वाने प्रगट होणें याची वाट पाहावी. त्याने आप-
चें ला आह्माकरितां दिल्हें. यासाठीं कीं त्याने
धर्मा ह्मास सर्व अन्यायांपासून खंडून घ्यावें, आणि

आपणासाठीं खासगीचे लोक चांगल्या कामामध्यें असें शुद्ध करावें." ( ख्रिस्ती शास्त्र. )

सर्व मनुष्यांचीं अंतःकरणें प्रकाशित करणारा जो याचा पवित्र आत्मा तो हें पुस्तक वाचणाऱ्याच्या मनांत ह्या ईश्वरी वाक्याचा प्रकाश पाडो.

समाप्त.